# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४९**

MAHMAR/19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक १० / सप्टेंबर २००१

## संपादकीय

### कॉम्प्युटर गेम्स : विचार प्रवृत्त करणारे एक संशोधन

जपानमधील अलीकडेच झालेल्या एका संशोधनाचे निष्कर्ष हे संगणकाच्या आपण करीत असलेल्या चुकीच्या वापराबाबत अंतर्मुख करणारे असे आहेत. या संशोधनानुसार शालेय विद्यार्थी अधिकाधिक हिंसक होण्यामागे संगणकावरील खेळ (Computer Game) हे एक अतिशय महत्त्वाचे कारण आहे.

संगणकावरील बहुतेक खेळामध्ये रक्तपात, हिंसा, खून, मारामाऱ्या अशा अमानुष कृतींना अवास्तव प्राधान्य दिलेले असते. शिवाय, माऊसच्या आधारे किंवा की-बोर्डच्या आधारे असे खेळ खेळताना त्यांच्यातील विलक्षण गतिमानता ही देखील मानवी ग्रहणशक्तीवर आणि मेंदूवर विपरित परिणाम करणारी अशीच असते. या खेळातील भडक रंग आणि गतिमानता यामुळे लहान मुले संगणकाला तासन्‌तास खिळून राहतात. आणि या सर्वाचे परिणाम स्वाभाविकच ती हिंसेला प्रवृत्त होतात असे या संशोधनाचे निष्कर्ष आहेत.

आपल्याला उपलब्ध असणारी माध्यमे ही माध्यमे म्हणून वाईट नसतात. तर, आपण त्यांचा करीत असलेला वापर हा चुकीचा असू शकतो असे आपल्याला दिसते. मेंदूचा विकास होण्याचा विकसनशील अशा वयात जर संगणकातील अशा खेळांची सॉफ्टवेअरस अव्याहत वापरली गेली तर मुलांच्या मनावर त्यांचा विपरित परिणाम होणारच ! भारतामध्ये सर्वसाधारणत: सर्वसामान्यांच्या जीवनात इतके अगणित प्रश्न आहेत की, या सामान्य माणसाच्या अग्रक्रमाच्या यादीत अजून संगणक या गोष्टीला फारसे महत्त्व आलेले नाही. तरीही समाजाच्या शहरी भागांमध्ये एक सुशिक्षित वर्ग असा आहे की, ज्यांच्या दृष्टीने संगणक घेणे ही शक्यतेच्या अवाक्यातील बाब झाली आहे. शिवाय ते प्रतिष्ठेचेही लक्षण बनू पहात आहे. अशा वर्गातील विद्यार्थ्यांच्या हातात जेव्हा संगणक येत आहे तेव्हा, संगणकाचा वापर अभ्यासापेक्षा खेळासाठी अधिक केला जात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे, दुसरी तिसरीतील मुलांना गोळ्या झाडून वर्गातील मुलांची हत्या करणे या पाश्चात्य जगातील गुन्ह्यासारखे आपल्याहीकडे गुन्हे घडायला लागण्याचा काळ येवू घातला आहे.

संगणक, इंटरनेट यांसारखी माध्यमे गुन्हेगारीला उत्तेजन देणारी ठरत असतील तर या माध्यमांच्या योग्य वापराबाबत सातत्याने शिक्षण दिले जाणे किंवा त्याबाबतची जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जाणे हे आवश्यक ठरते. विद्यार्थी कॉम्प्युटर गेमसाठी हटून बसतात. किंवा तासन्‌तास या खेळांमधील हा रक्तपाताचा संस्कार त्यांच्यावर होत राहतो, अशावेळी पालकांनी त्या विद्यार्थ्यांना संयम आणि तारतम्य यांची जाणीव करुन देणे हे आवश्यक आहे.

समाजातील हिंसा कमी झाली तर गुन्हेगारीही आपोआप कमी होईल. त्यामुळे, माध्यमांचा वापराबाबत सजगता निर्माण करणे हे प्रत्येक शिक्षिताचे कर्तव्य आहे !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक १० / सप्टेंबर २००१

किंमत रु. २०/-

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल खुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ११

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'शिक्षकांची विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी' | श्री. प्रभाकर द. अरदकर | ३ |
| २) | ऐसे आहे समाधान .... | श्री. अरविन्द दोडे | ७ |
| ३) | 'ईशावास्य उपनिषद' | सौ. गीता कुलकर्णी | ९ |
| ४) | प्रसार माध्यमांचे परिणाम | सौ.मोनिका दि. कुबर | ११ |
| ५) | ''स्त्रि -पुरुष समान आहेत का?'' | वर्षा गटणे | १४ |
| ६) | मराठी भाषेचा इतिहास : काही विचार | प्रा. मोहन पाठक | १६ |
| ७) | ॥ विर असे फाकडा ॥ | श्री. अरुण ठाकूर | १७ |
| ८) | पेटलेल्या पाण्याचा धगधगीत इतिहास- वडवानल | श्री. गजानन पळसुले-देसाई | १९ |
| ९) | पुस्तक परिचय -१ | प्रा. मोहन पाठक | २३ |
| १०) | पुस्तक परिचय -२ | प्रा. मोहन पाठक | २५ |
| ११) | राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा-काही विचार | श्री. वासुदेव देशपांडे | २७ |
| १२) | धर्माचे जपानमध्ये स्थान | पद्मिनी-तांबे-माहूरकर | ३० |
| १०) | संयम | सौ. वंदना प्रसादे | ३३ |
| ९) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही

# 'शिक्षकांची विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी'

*दिशातर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील तृतीय क्रमांक प्राप्त निबंध येथे देत आहोत. ५ सप्टेंबरला शिक्षक दिन आहे. त्यानिमित्ताने ह निबंध या अंकात घेतला आहे. - संपादक*

आज आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केला आहे. पण जेव्हा आपण अंतर्मुख होऊन विचार करतो की, जगाच्या नकाशावर आज आपल्या देशाचे स्थान काय? अजूनही आपला देश विकसनशील देशाच्या पंक्तीत मोडतो. आपल्या देशामध्ये लोकशाही तत्त्व अद्याप रुजलेली नाहीत. आपल्या देशापुढे अनेक अक्राळविक्राळ समस्या 'आ' वासून उभ्या आहेत. त्यामध्ये प्रमुख समस्या आहे निरक्षरता. अजूनही आपल्या देशामध्ये फक्त ५६% पुरुष आणि फक्त ३९% स्त्रिया साक्षर आहेत. आपल्या देशातील ४०% जनता अद्यापही दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठत आहे. महागाई दिवसेंदिवस आकाशाला भिडली आहे. बेकारीचा प्रश्न फार ज्वलंत आहे. सुशिक्षित बेकार आणि अशिक्षित बेकार दोहोंचेही प्रमाण आपल्या देशात गंभीर आहे. लोकसंख्या नियंत्रण करण्यामध्ये आपल्या देशाला पूर्णपणे अपयश आले आहे. घटनेने सर्वांना समानता प्राप्त करुन दिलेली असली तरी विषमता आमच्या मनातून पूर्णपणे पुसली गेलेली नाही. जाती, धर्म, पंथ, भाषा आदी भेदभाव अजूनही आपण सोडावयास तयार नाही आहोत. अस्पृश्यता अजूनही आपल्या देशावरील कलंक आहे, शाप आहे. पर्यावरणाचे जतन केले पाहिजे. निसर्गाचा समतोल राखला पाहिजे. भ्रष्टाचार तर आपल्या पाचवीलाच पूजलेला आहे. राष्ट्रीय चारित्र्य आणि सामाजिक बांधिलकी याची तिळमात्रही जाणीव आपल्याला नाही. सामाजिक नीतीमत्ता म्हणून काही चीज राहिलेली नाही. खालपासून वरपर्यंत संपूर्ण समाज भ्रष्टाचाराने खिळखिळा झालेला आहे. सामाजिक मूल्ये, नीतीमूल्ये यांची कुणालाही चाड राहिलेली नाही. हे राष्ट्रीय अध:पतनच आहे. अंधश्रद्धा, रुढी, परंपरा यांच्या मगरमिठीतून आपल्या देशाची सुटका झालेली नाही. वैज्ञानिक दृष्टीकोन, बुद्धिप्रामाण्यवाद आपल्या देशामध्ये अजून निर्माण व्हावयाचा आहे. या सर्व समस्यांना यशस्वीपणे, समर्थपणे तोंड देऊ शकेल, त्यांचे निराकरण करु शकेल, यासाठी आपण आशेने पाहू शकू असे नेतृत्व आपल्या देशाला लाभले आहे काय ? खचितच नाही. या अंधारामध्ये दीपस्तंभाप्रमाणे आपल्याला मार्गदर्शन करु शकतील, अशा आशेचा किरण मला फक्त शिक्षकांमध्येच दिसतो. कारण हे शिवधनुष्य लीलया पेलू शकतील, असे नेतृत्व उभे राहिलेच, तर ते शिक्षकांकडूनच उभे राहील असे मला वाटते.

शिक्षकांकडे एवढ्या आशावादी दृष्टिकोनातून मी का पहातो ? केवळ मी एक शिक्षक आहे म्हणून ? मुळीच नाही. त्याला तशीच कारणे आहेत. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक साधन आहे. शाळा या सामाजिक क्रांतीची केंद्रे आहेत. याचे अनेक दाखले आपल्याला इतिहासामध्ये सापडतील. आर्य चाणाक्याने (कौटिल्याने) चंद्रगुप्ताच्या मदतीने मगधाची जुलमी राजवट उलथून पाडली आणि तेथे मौर्य घराण्याची स्थापना केली. हिटलरने शालेय अभ्यासक्रमामध्ये क्रांतिकारक बदल करुन विद्यार्थ्यांमध्ये विजीगीषु वृत्ती, राष्ट्रीयत्वाची भावना, सर्व श्रेष्ठत्वाची भावना निर्माण केली आणि अक्षरशः पहिल्या महायुद्धानंतर बेचिराख झालेल्या देशाला फीनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून वर काढले. हे कशाच्या जोरावर? शिक्षक विद्यार्थ्यांना नवीन विचार देऊ शकतो, त्यांच्या वर्तनाला नवीन दिशा, नवीन वळण देऊ शकतो. त्यांच्या संस्कारक्षम मनावर संस्कार करुन त्याना मातीच्या गोळ्याप्रमाणे हवा तो आकार देऊ शकतो, त्यांना घडवू

शकतो. वसिष्ठ, विश्वामित्र या गुरुंनीच रामलक्ष्मणांना घडविले. कृप, द्रोणाचार्य या गुरुंनीच पांडवांना घडविले. विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी शिक्षकांचीच आहे.

आज आपल्या देशापुढे ज्या प्रमुख समस्या आहेत, त्यामध्ये 'लोकसंख्येचा विस्फोट' ही एक प्रमुख समस्या आहे. कुटुंब नियोजन, त्यानंतर कुटुंब कल्याण या योजना राबविण्यात आल्या. परंतु त्यांची अंमलबजावणी कठोरपणे न केली गेल्यामुळे, त्यामध्ये आपल्याला पूर्णपणे अपयश आलेले आहे. यासाठी नागरिकांचा या समस्येकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण कुटुंबाचा आकार लहान ठेवणे, हे आपल्या कुटुंबाच्या अंतिम फायद्याचे आहे, कल्याणाचे आहे ही जाणीव फार महत्त्वाची आहे. कारण कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवल्यामुळे आपले राहणीमान उंचावणार आहे, हे शिक्षकच विद्यार्थ्यांच्या मनावर दैनंदिन अध्यापनातून बिंबवू शकेल. त्यातून विद्यार्थी पुढे भावी माता-पिता झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम होऊ शकतील. विशेषतः गणित, भूगोल, विज्ञान, भाषा इ. विषयांच्या अध्यापनामध्ये याला बराच वाव आहे. त्याचप्रमाणे सहशालेय उपक्रमातून विविध माध्यमांद्वारे हे आपल्याला मुलांच्या मनावर ठसविणे सहज शक्य आहे.

दुसरी समस्या आहे. निरक्षरतेची. एकविसाव्या शतकामध्ये आपला देश जगातील सर्वात मोठा निरक्षरांचा देश म्हणून ओळखला जाईल. आपल्याकडे १४ वर्षांपर्यंत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय केली गेली, पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर एवढी अनास्था आहे आणि शासनाचे दुर्लक्ष आहे की प्राथमिक स्तरावरच गळतीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. यावर उपाय काय? विद्यार्थी ही शिक्षकांच्या हातातील फार मोठी शक्ती आहे. ही युवाशक्तीच खऱ्या अर्थाने 'शिव' शक्ती आहे. आणि तीच आपल्या देशाचे कल्याण करु शकेल. 'Each one, Teach one' ही योजना प्रत्येक शाळेमध्ये प्रत्येक शिक्षक राबवू शकतो. शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील प्रौढ निरक्षरांना साक्षर करण्यासाठी प्रयत्नशील बनवू शकतो. विद्यार्थ्यांच्याच माध्यमातून शाळेमध्ये न येणारी मुले, विशेषतः झोपडपट्टीतील, त्यांनी शाळेत यावे म्हणून उत्तेजन देऊ शकतो. त्यांच्या पालकांना देखील या गोष्टींचे महत्त्व पटवून देऊ शकतो. समाजसेवा विषयाच्या अंतर्गत अशा प्रकारचा प्रकल्प कायम स्वरुपी राबविता येईल. विद्यार्थ्यांना त्यासाठी गुणांचे प्रलोभनही दाखविता येईल. रात्रीच्या वेळी, सुट्टीच्या दिवशी विद्यार्थी आपल्या परिसरातील प्रौढ निरक्षरांना शिकवण्याचे कार्य करुन फावला वेळ सत्कारणी लावू शकतात. आणि अशा रीतीने एका ज्ञानज्योतीने दुसरी ज्ञानज्योत प्रज्वलित केली तर अज्ञानाचा अंधार दूर व्हायला कितीसा वेळ लागणार ? 'तमसो मा ज्योतिर्गमय', पण त्यासाठी सर्वांनी प्रकाशमयी व्हायला हवे. त्यामध्ये शिक्षकाचे कार्य हे दीपस्तंभासारखे आहे.

यानंतर प्रमुख समस्या आहे पर्यावरणाचे जतन आणि संरक्षण. उद्योगपती आणि बिल्डर लोक यांच्याकडून आपण निसर्गाच्या संरक्षणाची अपेक्षा बाळगू शकत नाही. कारण त्यामध्ये त्यांचा वैयक्तिक स्वार्थ दडलेला असतो. राज्यकर्त्यांचेही तेच-त्यांचाही वैयक्तिक स्वार्थ आणि हितसंबंध याच्या आड येतात. शिक्षकच निःस्वार्थी वृत्तीने आणि जाणिवपूर्वक पुरेशा संवेदनशीलतेने हे कार्य करु शकेल.

निसर्गाचा विनाश हा अखिल मानव जातीला विनाशाकडे नेणारा आहे. हा धोक्याचा कंदिल शिक्षक विद्यार्थ्यांना दाखवू शकतो. वसुंधरेच्या रक्षणामध्ये आपले रक्षण सामावलेले आहे. हे शिक्षक विद्यार्थ्यांना पटवून देऊ शकतो. विज्ञान, भूगोल, भाषा, पर्यावरण-शिक्षण इ. विषयांच्या अध्यापनातून हे सहज शक्य आहे. तुम्हाला एक झाड तोडावयाचे असेल तर निदान एक झाड लावले पाहिजे. त्याचे संवर्धन केले पाहिजे, ते जगविले पाहिजे.

हा विचार शिक्षकच विद्यार्थ्यांना देऊ शकतो. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' हे संतवचन प्रत्यक्षात जीवनामध्ये आचरणात आणावयाचे असेल तर आपण 'वृक्षमित्र' बनले पाहिजे. त्यातच आपला फायदा आहे. आपले अंतिम हित आहे. आपण स्वयंचलित वहान वापरत असू तर त्या वाहनाची योग्य ती निगा राखून वायू प्रदूषण कमीत कमी होईल याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. ध्वनी-प्रदूषण होणार नाही याची दक्षता आपण घेऊ शकतो.

आपल्याकडे राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव आढळतो. आपण आपल्या हक्कांच्या बाबतीत जेवढे जागरुक असतो, तेवढे आपल्या कर्तव्यांच्या बाबतीत कधीच नसतो. दंगलीच्या वेळी राष्ट्रीय संपत्तीची, मालमत्तेची नासधूस करण्याकडे प्रवृत्ती आढळते. राष्ट्रीय संपत्ती म्हणजे जनतेची, पर्यायाने आपलीच संपत्ती आहे. ही जाणीव शालेय जीवनापासूनच शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करू शकतो. आपली व वैयक्तिक स्वच्छता कितीही चांगली असली तरी सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत आपण मागासलेलेच आहोत. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, कचरा टाकणे, या गोष्टी टाळल्या पाहिजेत. हे विचार शिक्षकच विज्ञान, आरोग्यशिक्षण या विषयांद्वारे विद्यार्थ्यांना देऊ शकतो.

आजकाल आपण पाहतो, बरेच सुशिक्षित हे स्वार्थी आहेत. ते आपल्यापुरताच विचार करतात. आपल्या पलीकडे जाऊन पहात नाहीत. कारण त्यांची वृत्ती संकुचित आहे. कारण असे लोक फक्त सुशिक्षित झालेले असतात, सुसंस्कृत झालेले नसतात. दीन-दुबळ्यांचे अश्रू पुसण्यासाठी ज्ञान मिळविणे, आपला सर्वांगीण विकास हा समाजासाठी आहे, अशा प्रकारचा हेतू किंवा प्रयोजन शिक्षणाला प्राप्त करुन देणे हे कार्य शिक्षक आपल्या आचरणातून आणि दैनंदिन अध्यापनातून करू शकतात. डॉ. राधाकृष्णन यांनी म्हटल्याप्रमाणे माणूस खऱ्या अर्थाने अद्याप माणूस झालेला नाही. आणि तो ज्या दिवशी माणसाशी माणसासारखा वागेल तो खरा सुदिन. आणि ही मानवतेची मूलभूत जाणीव निर्माण करणे हे खऱ्या आदर्श शिक्षकाचे कार्य आहे.

स्त्रीपुरुष समानता, जाती, पंथ, धर्म, भाषा इ. भेदभाव न मानणे इ. गुण शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये दैनंदिन अध्यापनातून, त्याचप्रमाणे सहशालेय उपक्रमांतून, विविध प्रकल्पांतून जोपासू शकतो. भ्रष्टाचार ही आपल्या समाजाला लागलेली कीड आहे. तिचे समूळ उच्चाटन करायचे असेल तर थोडी सोशिकता, सहनशिलता आपल्याकडे हवी. लाच घेणे आणि देणे दोन्ही गुन्हेच आहेत. कित्येकदा आपल्याला आपले काम लवकर पूर्ण व्हावे असे वाटत असते त्यातून आपण वशिला लावतो, लाच देतो, ओळखीचा उपयोग करुन घेतो. त्यातूनच कळत नकळत आपण भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. त्यासाठी थोडा वेळ लागला तरी चालेल, थोडा त्रास झाला तरी चालेल अशी वृत्ती ठेवून त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे. दुसऱ्याच्या मताबद्दल आदर राखणे इ. गुण विद्यार्थी पार्लमेंट, युवकसभा, विद्यार्थी मंडळ इ. माध्यमातून शिक्षक विद्यार्थ्यांना अंगी बाणवू शकतो. हीच खऱ्या लोकशाहीची बीजे आहेत. या पुढे देशाला भावी नागरिक, देशाचा भावी नेता किंवा शासनकर्ता आमदार, खासदार, मंत्री म्हणून आवश्यक आहेत. या सर्व गुणांची जोपासना शिक्षक विद्यार्थी दशेतच करु शकतो.

गणित, विज्ञान इ. विषयांच्या अध्यापनातून शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, बुद्धिप्रामाण्यवाद निर्माण करु शकतो. बुद्धीला आणि तर्काला पटेल अशाच गोष्टी कराव्यात. यातूनच तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लागेल. त्यातूनच अंधश्रद्धा कमी होईल. बुरसटलेल्या चालीरीती आणि प्रथा परंपरा, बुवाबाजी, मांत्रिक-तांत्रिक इ. गोष्टी कमी होतील. आणि एकविसाव्या शतकात पदार्पण केलेल्या राष्ट्राच्या दृष्टीने या गोष्टी आवश्यक आहेत. तरच जागतिकीकरणाच्या झंझावातापुढे आपल्या देशाचा

निभाव लागू शकेल. आपण अध्यापनातून अशा प्रकारचा वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करु शकतो.

शिक्षकापुढे फार मोठे आव्हान उभे ठाकले आहे. ते माहिती आणि तंत्रज्ञानाचे. आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केला आहे. ज्ञानाचा विस्फोट आधीच झालेला आहे. एकविसावे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे जी व्यक्ती आणि जे राष्ट्र माहिती आणि तंत्रज्ञानामध्ये अग्रेसर राहणार आहे, त्या व्यक्तीला आणि राष्ट्रालाच एकविसाव्या शतकामध्ये अनन्यसाधारण महत्व प्राप्त होणार आहे. जे राष्ट्र माहिती आणि तंत्रज्ञानामध्ये समृद्ध असणार आहे तेच राष्ट्र यापुढे जगामध्ये महासत्ता बनवणार आहे.इंटरनेट माध्यमामुळे जग दिवसेंदिवस अधिकाधिक जवळ येत आहे. जगाचे एका छोट्या खेड्यामध्ये रुपांतर झालेले आहे. हे लक्षात घेऊन शासनाने संगणक अभ्यास, सामान्यज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञान या विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये केलेला आहे, आजच्या विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान मागच्या पिढीतील विद्यार्थ्यांपेक्षा निश्चितच जास्त आहे. रेडिओ, टी.व्ही., वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी निरनिराळ्या माध्यमांमुळे त्याचे सामान्यज्ञान वाढलेले आहे. आजचा विद्यार्थी चौकस आणि जिज्ञासू आहे. त्याच्या नानाविध शंकांचे निरसन करण्याची इच्छा आणि कुवत आजच्या शिक्षकांकडे असली पाहिजे. आजच्या प्रत्येक शिक्षकाला संगणकाचे किमान प्राथमिक शिक्षण तरी घ्यावेच लागेल आणि इंटरनेट या माध्यमाशी परिचय करुन घ्यावा लागेल. निरनिराळ्या संदर्भग्रंथांचा अभ्यास करुन, निरनिराळ्या माध्यमांद्वारे ज्ञान आणि माहिती मिळवून शिक्षकाला आपले विषयज्ञान अद्यावत करावे लागेल. आपल्या अध्यापन विषयांव्यतिरिक्त इतर विषयांमध्ये देखील त्याला रुची दाखवावी लागेल. थोडक्यात ' Jack of all but master of none' या प्रसिद्ध उक्तीत थोडा बदल करुन "Jack of all trades but master of at least one' असे आजच्या शिक्षकांनी बनायला हवे.

थोडक्यात असे म्हणता येईल, वाल्या कोळ्याचा वाल्मिकी होऊ शकतो. याला जबाबदार नारदमुनींच्या सारखा शिक्षकच. त्याचे सारे श्रेय त्यांनी दिलेल्या विचाराला, केलेल्या संस्काराला आहे. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम वयामध्ये शिक्षकांनी त्यांच्या विचारांना दिशा दिली, त्यांच्या मनावर संस्कार केले, त्यांना नवीन विचार दिले, तर त्यातूनच पुढे त्यांच्या जीवनामध्ये आमूलाग्र क्रांती होईल. आणि देशातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास झाला. देशातील प्रत्येक व्यक्ती सुधारली तर पर्यायाने संपूर्ण देशच सुधारला सारखा आहे. त्यामुळे शिक्षणक्षेत्र आणि शिक्षक हे एकमात्र आज आपल्यापुढे आदर्श आहेत आणि ज्यांच्याकडून काही भरीव सामाजिक आणि राष्ट्रीय कार्य होऊ शकेल अशी अपेक्षा आपण करु शकतो.

परंतु याला देखील एक 'पण' आहे. शिक्षकाच्या सर्व क्षमतांचा पूर्णपणे उपयोग समाजासाठी, राष्ट्रासाठी करुन घ्यायला हवा असेल तर त्याला पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. सध्याची शिक्षणपद्धती, परीक्षापद्धती बदलली पाहिजे. आज तो केवळ पुस्तकी शिक्षणाच्या जंजाळात अडकला आहे. त्यामुळे आज तो केवळ 'शिक्षक' आहे. त्याला संस्थाचालक, पालक, मुख्याध्यापक, शासन यांनी पुरेसे स्वातंत्र्य दिले पाहिजे. समाजामध्ये प्रतिष्ठा, मान सन्मान आणि आर्थिक सुबत्ता दिली पाहिजे. जेणेकरुन तो केवळ 'शिक्षक' न राहता अध्यापक, आचार्य आणि गुरु या पुढील श्रेष्ठत्वाच्या पायऱ्या लीलया चढू शकेल. आणि विद्यार्थ्यांना घडविण्याची आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडू शकेल.

**श्री. प्रभाकर द. अरदकर**
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

• • •

# ऐसी आहे समाधान ....

*समाधाचे रुप कोण जाणतो ? ज्याला आवर्जून समाधानी होता आलं त्यालाच हे रुप जाणवतं... आत डोकावावयास हवे - संपादक*

समाधान !

ते कसं असतं ? ते शब्दात सांगता येतं का ? सुखाशी समाधानाचं नातं काय? शांतीशी कोणता संबंध? असे प्रश्न आपण विचारतो तेव्हा उत्तरं काय मिळतात? 'चित्ती असो द्यावे ! समाधान !!' असं संतवचन ऐकताना अनंताने कसेही ठेवले तर आपल्याला चालेल का ? समाधानाच्या सम्यासोयऱ्यांची ओळख झाल्यावरच समाधानाची भेट घेणं सोपं होतं का ? की सरळ त्यालाच गाठावं म्हणजे आप्तस्वकीय आपोआप परिचयाचे होतात?

खरं तर आपण स्वतःच्या सुखाबद्दल इतकं बडबडत असतो की, अप्रत्यक्षपणे दुःखालाच साद घालत असतो. सुखाला फार किंमत मोजावी लागत नाही, पण खोट्या नाण्यासाठी आपण केवढा तरी वेळ आणि पैसा खर्च करतो. तसचं सुखावर सगळा भार टाकून जगण्याचा आपला आटापिटा क्वचितच सुख देतो. 'आपण सुखी आहोत' हे कळलं की दुःख उरत नाही. हे कळण्यासाठी काय करावं?

दुसऱ्यांचं बोलणं आणि त्यांचं वागणं यावर आपण बोललो नाही की, पुष्कळ शांतता लाभते. शांततेच्या राज्यातच सुख असतं. तिथंच दया, क्षमा आवडीनं निवास करतात. समाधानाची रोपटी त्याच प्रदेशात मुळं धरतात. वाढतात. फोफावतात. त्यांच्या शीतल छायेतच परम आनंद चित्ताला लाभतो. असा प्रदेश धुंडाळण्यात आयुष्य 'वाया' जातं. कारण तो प्रदेश बाहेर नसतोच मुळी !

'संतोष यही सच्चा धन है ।' असा सुविचार दुकानात, शाळेत वा मंदिरात वाचायला मिळतो. असं हे धन मिळवणं सोपं असतं, ते जतन करून ठेवणं अवघड असतं का ? ज्याच्याजवळ खूप काही तो श्रीमंत, असं आपण मानतो. पण जो जास्त हावरेपणा करीत नाही, तो खरा धनवंत. समाधानाचं सूत संपत्तीशी जमणं तसं कठीणच असतं. एक गमतीदार सुवचन आहे, जर देवाला पैशाचं महत्त्व वाटलं असतं तर त्यानं कुठल्याही हरामखोराला पैसा दिलाच नसता !

समाधानाचं महत्त्व संपत्तीइतकच आहे, ह्यावर विश्वास ठेवला की, मग आतही समृद्धी वाढत जाते. समाधान पंख फुटून उडून जाण्याची वाट पाहत नाही, म्हणून ते अदृश्य असतं. सुप्रसिद्ध रशियन लेखक मॅक्झिम गोर्की हा अमेरिकेस गेल्यावर त्याला एका उद्योगपतीनं प्रीतिभोजनाचं आमंत्रण दिलं होतं. गोर्कीनं जेवता जेवता विचारलं,

'तुमच्या अनेक कंपन्या आहेत ना ?'

'होय'

'मग पुढील योजना काय आहेत?'

'आणखी काही कारखाने सुरु करायचे आहेत.'

'दिवसातून किती वेळा जेवता?'

'दोनदा. थोडं तूप, कोंबडीच थोडं मांस, एखादा गोड पदार्थ. एवढ्यावर माझं भागतं.'


'मग एवढ्या पैशाचं करता काय?'

'अधिक पैसा मिळविण्यासाठी !'

'कशासाठी?'

गोर्कींच्या या प्रश्नावर तो अब्जाधीश काय उत्तर देणार ? त्यानं उलट प्रश्न केला, 'वेड लागलंय का?' 'वेड मला लागलयं की तुम्हाला ? एवढी हाव पैशाची ?'

गोर्की स्वतः क्रांतिकारक, लेखक होता. प्रचंड दारिद्यात त्याचं किशोरपण गेल्यानं समाधानाशी त्याचा परिचय झाला होता. त्याला जे 'आत' गवसलं होतं, ते तो धनवान 'बाहेर' शोधत होता !



समाधाचा शोध-लंबक अव्याहत घेतच असतो.

आपल्या संस्कृतीत समाधानवृत्तीला धर्माइतकंच महत्त्व आहे. संत-सज्जनांनी समाधानाची व्याख्या करणं आत्मज्ञानाप्रमाणेच शब्दातीत असल्याचं म्हटलयं. तुकोबांनी शिवरायांनी पाठवलेला नजराणा साभार परत केला. समर्थांनी शिववांच राज्य रामदासीवृत्तीनं चालवायला शिकवलं. नरसी मेहता यांचे अनेक नातेवाईक देवाघरी गेल्यानं देवालाच आपला 'मायबाप' समजून त्यांचे तप पूर्णतेस गेलं. एकनाथांनी आपल्या गृहकृत्यदक्ष स्वामिनीस देवी समजून साधना केली आणि तुकोबांनी म्हटल,' बरे झाले देवा । बाईल कर्कशा । जनी ही दुर्दशा । वरी झाली ॥' तिघांच्या जगण्यात अन् वागण्यातून समाधानच नाही दिसत? पारतंत्र्यात बंड पुकारणाऱ्या क्रांतिकारकांना, स्वातंत्र्य सैनिकांना काय मिळतं ? घोर नरकयातना, तुरुंगवास किंवा भूमिगत जीवन. त्यातच त्यांचं समाधान असतं. पण ते ही संतांनी ' निकृष्ट समाधान' म्हणून नाकारलंय. योगी अरविन्दांना उभ्या ह्यातीत केवळ एक वर्ष तुरुंगवास घडला, पण त्या एक वर्षात सतत साधना करून त्यांनी 'परम' समाधान मिळवलं. ते क्रांतिकारक म्हणून कैद झाले अन् योगी म्हणून बाहेर पडले. कारण त्यांनी आपल्या तनमनाला 'अहंकाराचा वारा' लागू दिला नाही. हे कसं घडलं? चित्तवृद्धी विकारांकडून सुविचारांकडे वळवली तेव्हा.... 'निःशब्दाची ऐसी खूण। ओळखावी ॥''

आपलं आयुष्य म्हणजे दुःखाचा अंकुर, शोकाचा सागर आणि भयाचा डोंगर ! आपलं जगणं म्हणजे लोभाचं कमळ, कुविद्येचं फळ आणि मृत्यूला कारण... म्हणून जे पूर्व-सुकृताचं फळ लाभलयं त्यात आनंद मानावा. 'मानवधना' चं संवर्धन करावं. मनाचं प्रबोधन व्हावं. रंजनातून अंजन लाभावं आणि त्या अंजनानं डोळसपणा यावा. स्वप्न आणि सत्याचा न्यायनिवाडा करावा. सत्याच्या सावलीत शाश्वत सुख आपली वाट पहात असतं. मधली वाट संपवताना ते भेटतं. समाधान हे असं असतं. ते शब्दांत सांगता येत नाही. समर्थ रामदासांनी म्हटलयं,

**'ऐसे आहे समाधान ।**
**बोलताच न ये जाण ।**
**इतुकेन बाणली खूण ।**
**निःशब्दांनी ॥'**

अरविन्द दोडे
शालन भोईर वाडी, ठाणे.

•••

# "ईशावास्य उपनिषद"

*उपनिषदे हा गहन विषय आहे. त्यातील ईशावस्या उपनिषदांवर केवळ ओळख या स्वरुपाचा छोटा लेख येथे देत आहोत. - संपादक*

उपनिषदांवर लिहायचे हा जरा वेगळा अनुभव आहे. कारण उपनिषदे म्हटली की ती फार अवघड आहेत, त्यातील विचार फार कठीण आहेत अशीच बुहतेकांची समजूत असते. मी आज अतिशय जुने व श्लोकांच्या संख्येने छोटे (फक्त २०) असे जे 'ईशावास्य उपनिषद' आहे. त्यातील आशय मांडण्याचा प्रयत्न करते.

प्रथमतः 'उपनिषद' ह्या शब्दाची आपण व्युत्पत्ती कशी आहे ती पाहून. उप म्हणजे जवळ, नि म्हणजे खाली, सद् म्हणजे बसणे. म्हणजेच खाली बसून शिकण्याची विद्या. गुरुंच्याजवळ बसून त्यांना प्रश्न विचारून, त्यांच्याशी चर्चा करून मिळवलेले ज्ञान. ह्या पद्धतीत तर्क करून शंका निरसन करता येत असे. नवीन अर्थ निघाले तर त्यावर चर्चा होत असे. त्यामुळे उपनिषदातील ज्ञान, तत्त्वे सतत नवीन भर टाकत गेले. त्यामुळे ऋषींचे अनुभव वेगवेगळ्या उपमांनी त्यांनी सांगितले. त्यामुळे उपनिषदांची संख्या कोणी १०८ तर कोणी २०० च्या वर ही आहे असे म्हणतात. पण आपल्या मुख्य आचार्यांनी म्हणजेच श्रीशंकराचार्यांनी व श्री मध्वाचार्यांनी फक्त (१०) दहाच मुख्य उपनिषदे मानली व त्यावर आपापली भाष्ये लिहिली. ती अशी (१) ईशा (२) केन (३) कठ (४) प्रश्न (५) मुंडक (६) मांडुक्य (७) तैतरिय (८) ऐतरिय (९) छांदोग्य व (१०) बृहदारण्यक.

त्यातील ईशावास्य उपनिषदावर मी लिहिण्याचा प्रयत्न करते. हे उपनिषद 'ईश' म्हणजेच ईश्वराबद्दलचे ज्ञान सांगते. त्यानेच सृष्टी निर्माण केली व तो रक्षण व संहार करणारा आहे. त्याने निर्मिलेल्या सृष्टीत तोच असल्यामुळे आपण सर्वांनी त्याच्या अस्तित्वाचा आनंद मिळवला पाहिजे. तो आनंद मिळविण्यासाठी आपण सर्वांनी आपले कर्म हे ईश्वराचे आहे असे समजून सतत केलेच पाहिजे. त्यासाठी ज्ञान मिळविलेच पाहिजे. स्वकर्म व ज्ञान घेतच आपण शंभरवर्षे जगत रहावे असे हे उपनिषद आपल्याला पहिल्या दोन श्लोकात सांगते. उदा. ईशावास्यमिदं सर्व यत् किंच्य जगत्यां जगत् तेन त्यक्तेन भुजीथाः मा गृधः कस्यस्विध्दनम् ॥१॥ अर्थ - हे सर्व जग ईश्वराचे आहे व तो त्याचा निर्माता, रक्षणकर्ता व संहार करणारा आहे. तो सर्व सजीव व निर्जिव वस्तूत आहे. प्रकृती त्याच्यावरच अवलंबून आहे.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत्! शतं समः ॥ एवं त्वयिं नान्यथा इतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥२॥ अर्थ - प्रत्येकाने स्वतःचे नेमून दिलेले कर्म ईश्वराने दिले आहे असे समजून ते आपले कर्तव्यच आहे असे समजून शंभर वर्षे करत रहावे. असे कर्म आपल्याला वाईट बंधनातून तर सोडतेच पण जन्म-मरणाच्या फेऱ्यातूनही सोडवते.

हे उपनिषद स्वकर्मांचे महत्त्व सांगतेच पण ते कसे करायचे हे ही सांगते. त्यासाठी ज्ञान-विज्ञान, विद्या-अविद्या म्हणजे काय हे ही सांगते. स्वकर्म शंभर वर्षे करावयाचे म्हणजे ज्ञान, संपत्ती, शरीर संपदा हवीच. विज्ञान-अविद्या म्हणजेच भौतिकज्ञान हे आवश्यक आहेच. पण ते मिळवतच विद्येकडे म्हणजेच ज्ञानाकडेही जायचे आहे. म्हणजेच विज्ञान व ज्ञानाचा संगम सांगितला आहे. त्याला विरोध नाही. पण हे उपनिषद फक्त भौतिक ज्ञान-विज्ञानाकडे न थांबता विद्येकडे जाण्यास सांगते. कारण भौतिक ज्ञान,

सुखाची आवड निर्माण करते. सुख हे हवेसे वाटते, त्याला मर्यादा आपण घालावयाच्या आहेत. कारण आपल्या सर्वांना सुखापेक्षा आनंदाकडे जावयाचे आहे. आपला आत्मा आनंदमयी आहे व ईश्वरही आनंदमयी आहे. ईशावस्यउपनिषद आपल्याला आपले शरीर भस्मच होणार आहे व त्यात रहाणारा आत्मा हा शाश्वत आहे हे सांगते. त्यामुळे अशाशाश्वतकडून शाश्वताकडे जाण्यासाठी ईश्वराचे स्मरण करत जगा असा ह्या उपनिषदाचा संदेश आहे.

सौ. गीता कुलकर्णी

अ-३०६, मिस्री अपार्टमेंट, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

•••

## *होकारार्थी विचार*

१. आजचा दिवस चांगला जाईल.

२. मी जेवढा विचार करतो त्यापेक्षा अधिक काही हाताळीन.

३. यावरुन कोणत्याही घटना चांगल्या होत नाही.

४. मी चांगले प्रयत्न करुन समाधान देऊ शकेन.

५. आनंदी होण्यासारखे नक्कीच काही तरी करेन.

६. आज मी कोणाला तरी आनंदित करेन.

७. निराश होणे चांगले नाही.

८. जीवन जास्तीत जास्त चांगले करा.

*आशावादी व्हा!*

## नक्षत्रांचे लेणे !

वळवणीतला.... निरव गारवा.
तिथे सारखा... घुमे... पारवा !
ओठी आमुच्या सहज स्फुरे अन आनंदाचे गाणे।
गवसे आम्हा, आज अचानक नक्षत्रांचे लेणे ॥धृ ॥

वर्षत धारा येई अम्बर,
धरणी गहिवरे, हिरवा अंकुर
पाती बांधुन रुण-झुणू घुंगुर
खुले पिसारा मन मोराचा,
थक - थत ! थक - थय ! चाले नर्तन !
सुचती नवे तराणे ॥१ ॥

चित्र-कार 'तो' : चित्र -कथी 'तो'
संध्या कधी तर - उषा स्वप्न 'तो'
उसवी क्षितीजे..... रंग...रंग- 'तो'
न्हाऊन रंगे...छंदां संगे,
कण...कण... क्षण..क्षण घडवी दर्शन
नित्य नवी लावण्ये ॥२ ॥

श्री. वासुदेव जगन्नाथ हजारे
ठाणे.

# प्रसार माध्यमांचे परिणाम

*प्रसार माध्यमांचा उपभोक्त्यांवर होणारा परिणाम हा संमिश्र स्वरूपाचा, गुंतागुंतीचा आहे. आजच्या जाहिरात व माहिती युगात तर ही गुंतागुंत अतिशय वाढली आहे. त्याबद्दलची काही निरीक्षणे, काही मते. - संपादक*

तीन वर्षांचा राजु आपल्या आईला सांगत होता, 'आई मला पोहे, पोळी, दूध वगैरे नको आहे तर मला नूडलस्, कॅडबरीज हवे आहेत. आमची मोलकरीण कधी 'सर्फ एक्सेल' मागते तर कधी 'उजाला' का ? तर म्हणे आमचा टी.व्ही. सतत सांगत असतो काय वापरायचे ते.

आपल्या देशात लोकशाही आहे, प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा आत्मा आहे, म्हणूनच म्हटले जाते की, उपलब्ध प्रसारमाध्यमांचा सुयोग्य वापरावरच देशाची , समाजाची प्रगती व विकास अवलंबून असतो. आपल्याकडे वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, आकाशवाणी, चित्रपट, लघुपट, दूरदर्शन वगैरे मुख्य प्रसार माध्यमे आहेत. ह्या माध्यमांनी बरेच जाळे विणले आहे. नित्यनव्याने मासिके, साप्ताहिके, दैनिके नियतकालिके इ. नियत असतात. वाचकवर्गही बराच असतो. दररोज सकाळी वृत्तपत्र न वाचल्याने बेचैन होणारी माणसं आजही बरीच आहेत. चित्रपट निर्मितीत तर आपला देश आशियाखंडात अग्रक्रमावर आहे. माहितीपट कथापट ही बरेच निघतात. आकाशवाणीवरील बातम्या ऐकणारेही आहेत, पण आजच्या शतकात सर्वांत प्रभावशाली व आपलंस वाटणारं, जवळिक साधणारं जिव्हाळ्याचं कोणतं माध्यम असेल तर ते दूरदर्शन.

प्रसारमाध्यमांची देशाला फार गरज आहे, पण सर्वांत लोकप्रिय, लहान मूलांपासुन तरुणांना व वृद्धांना अगदी सर्वांना जिव्हाळ्याचे माध्यम म्हणजे दूरदर्शन. हे दूरदर्शन इतके प्रिय का आहे ? तर घरबसल्या विनासायास आपल्या रोजच्या, नेहमीच्या चाकोरीबद्ध जीवनातून क्षणकाळ का होईना सुटल्याची जाणीव होते. चांगलाच विरंगुळा व करमणूक होते. आपल्या भोवतालच्या नेहमीच्या जगापेक्षा जरा अन्य वेगळ्या जगाची माहिती मिळते, दर्शन घडते काहीतरी नवीन शिकायला मिळते. म्हणूनच आज दूरदर्शनने चित्रपट व आकाशवाणी यांनाही मागे टाकले आहे.

प्रसारमाध्यमांचे खरे काम शिक्षणाचा ध्यास, ज्ञानाचा प्रसार विस्तारपूर्वक माहिती, राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार, राजकीय ज्ञान सामाजिक परिवर्तनाकरिता संप्रेरक शक्ती, राष्ट्रीय व भावनिक ऐक्यासाठी प्रेरणा निर्माण करणे, जनमानसात वैज्ञानिक दृष्टी आणणे. कुटुंब-नियोजनाचा प्रसार करणे दुर्बल घटकाच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असणे अधिक धान्य उत्पादनाकरिता आधुनिक शेतीची माहिती घेणे, खेळाची आवड तयार करून खेळाडू निर्माण करणे, कलाकारांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या कलेला वाव देणे, आपला सांस्कृतिक वारसा कायम राखण्यासाठी सामाजिक व जीवनमूल्यांची जोपासना करणे. लघु-उद्योगांची माहिती देणे, वगैरे बरीच विधायक कामे प्रसार माध्यम करीत असतात. त्यातल्या त्यात दूरदर्शनमुळे विशेषतः थेट-प्रक्षेपणांमुळे माणसांना घरबसल्या आपला आवडता खेळ, सिनेमा, राजकीय नेता ह्यांना पाहता येते. त्यांच्या हालचाली, वागणे, बोलणे बघता येते. दूरदर्शनच्या कार्यक्रमाचा परिणाम म्हणजे बोलणारी व्यक्ती किंवा ऐतिहासिक रम्य ठिकाण समोर असल्यामुळे कार्यक्रमात जास्त समरस होता येते. श्रुतीने जो परिणाम होत नाही तो दृश्याने होतो. दृश्य आणि श्राव्य ह्या दोन्हींचा मिलाफ आहे. डोळे आणि कान ह्यांच्यावर परिणाम होत असल्यामुळे

माणसं गुंग होऊन जातात. आजची पिढी दूरदर्शनमुळे गुंग झाली आहे. प्रसाममाध्यमाचे चांगले वाईट-परिणाम होत असतात.



दूरचित्रवाणी मुळे आजची पिढी चाणाक्ष व हुशार झाली आहे. सामान्य-ज्ञान खूप वाढले आहे. कोणत्या कंपनीचा माल कसा आहे, गाडीचं मॉडेल कसं बाजारात येत आहे या बद्दल लहान मुले सुद्धा आपली मतं देत असतात. जाहिरातीच्या युगात स्पर्धेची चढा-ओढ वाढत आहे, ह्या स्पर्धेला तोंड देत आजचे तरुण टिकून आहेत. दूरदर्शनेचे कार्यक्रम पाहून भावना उत्तेजित होतात व कर्तबगारीला वाव मिळतो. एकप्रकारचे आव्हान मिळते. व्यक्तिमत्वाचा विकास होतो. स्वतः विचार करून आपली निर्णयशक्ती वाढवता येते. नवीन कलाकार निर्माण होत आहेत. राजकीय, सामाजिक परिवर्तनाबद्दल तरुण पिढी जागृत आहे. राष्ट्राच्या प्रगतीत हात-भार लागत आहे. आकलन बुद्धी वाढील लागली आहे. संयुक्तिक केशभूषा, वेशभूषा राहणीमान, शिष्टाचार ह्याची कल्पना चांगली येते. लोकसभा, राज्यसभा गाजत असतात. राजकीय नेत्याबद्दल आपले स्वतः चे मत बनवता येते. आजच्या पिढीचा सर्वांगीण विकासावर प्रसारमाध्यमांचा परिणाम होताना दिसत आहे. जगाचा साद्यंत परिचय एका सेकंदात होतो. असे हे दूरदर्शनचे माध्यम शाप की वरदान हे ठरवणे कठीण झाले आहे.

सर्वसाधारणपणे आपल्या समाजावर तीन शक्तींचा जास्त पगडा असतो. कुटुंब, शाळा आणि धर्मश्रद्धा. माणसांच्या आवडी-निवडी आचार-विचार सद्विवेकबुद्धी जिवितमूल्ये चांगले-वाईट ठरविण्यात ह्या तीन शक्तींचा प्रामुख्याने हात असतो. पण ह्या सर्वात एक प्रभावशाली शक्ती उदयास आली आहे ती म्हणजे दूरचित्रवाणी होय. दूरदर्शनची ही चौथी शक्ती, जशी चांगली आहे तशी वाईटही आहे. विधायक आहेत तितकीच विध्वंसक आहे. ही चौथी शक्ती आजची गरज झाली आहे. डोळे आणि कान सतत दूरदर्शनकडे असल्यामुळे मन आणि मेंदू बधिर झाले आहेत. मनावर दूरदर्शनचे नकळत प्रचंड परिणाम होत असतात. जर एखाद्या मित्राचा किंवा व्यक्तीच्या सहवासात आपण सतत राहिलो तर त्या व्यक्तीच्या सवयी आपल्यात आपोआप उतरतात. दूरदर्शनच्या सहवासात जास्त राहिल्यामुळे त्याच्यातील काल्पनिक अतिरंजित रंजक घटनेवर व तसा थरारक अनुभव घेण्यासाठी आपली पिढी तसा प्रयत्न करते व स्वतःला इजा करून घेते. तसेच जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. दूरदर्शनवरचे चांगले कार्यक्रम जाऊन आता त्याचे व्यापारीकरण झाले आहे. खाजगी चॅनल्स आपल्या मालाची जाहिरात जास्तीत जास्त करण्यासाठी व्यापारी लोक विकत घेताता व तरुणांची आवड लक्षात घेऊन नजरेला सुख मिळावे म्हणून काही अश्लील चित्रपट, भडक जाहिराती, उत्तान मालिका, हाणामारी, अश्लील नृत्ये, अंगप्रदर्शन, विवाह बाह्य संबंध, दरोडा, चोऱ्या, खून, सूड, बदला कसलीही वास्तवता नसलेले चित्रपट व मालिका सर्रास व सतत पाहिल्यामुळे त्याच्यातला मुख्य संदेश (मध्यवर्ती कल्पना) बाजूलाच राहते व नको असलेल्या गोष्टीच जास्त आत्मसात केला

जातात. एकतर्फी प्रेमाचं गुन्हेगारीकरण झालेले आहे. "तू हाँ कर या ना कर तू है मेरी किरन" अशी गाणी ऐकत तेच अनुकरण करण्याचा प्रयत्न होतो आहे.

दूरदर्शन पाहाताना त्या पात्राशी एवढे एकरुप होतात की स्वःताला त्या पात्राच्या जागी समजू लागतात. आपल्या कुंटुंबापेक्षा ते पात्र त्यांना अधिक जवळचे वाटते. त्यामुळे त्या पात्राचे आचार-विचार जिवितमूल्ये घेतली जातात. चोरी-दरोडे करायला बऱ्याच कल्पनां या चित्रपट व मालिकांमधून मिळतात. बदला घेणे सूड ऊगवणे ह्याच्यात पुरुषार्थ मानला जातो. स्रियांचे विकृत दर्शन घडवून स्त्रियांबद्दल अनादर, टिंगल, चेष्टा केली जाते. वाचन, मैदानी खेळ, नातेवाईकांकडे जाणे येणे ह्याला महत्त्व देत नाहीत. नको असलेल्या गोष्टींच अनुकरण केल्यामुळे व्यक्तिमत्त्व ढासळत जाते, फ्रस्ट्रेशन येते, आत्महत्ये सारखी प्रवृत्ती वाढत आहे. डॉयलॉग बाजी व सतत प्रेमप्रकरणे पाहात असल्यामुळे आई-वडिल, मोठी माणसं त्यांच्या बद्दलचा आदर कमी झालेला आहे. मुले स्वतःला विसरली आहेत. भडक व चळवळी वृत्तीची मुले असल्यास दूरदर्शनवरचे कार्यक्रम पाहून बिथरतात, उद्रेक होतो, भितीदायक कार्यक्रम पाहिल्यास काही मुलं कायमची घाबरट बनतात. दूरदर्शन जवळून पाहिल्यास डोळ्यावर परिणाम होतात. आणि म्हटलेच आहे की आजच्या लोकांना विशेषतः विद्यार्थ्यांना 'नको वह्या, पुस्तक टेबल, परि असावा टी.व्ही. केवल !'

निर्मात्यांनी जरा सावधगिरीने व आपला सांस्कृतिक वारसा कायम राखण्यासाठी मुलांची सर्वांगीण जोपासना होण्यासाठी दूरदर्शनवर चांगले कार्यक्रम दाखवावेत. डोळ्यांना व कानांना सुखावह वाटणारे असावेत. आपल्या निर्मितीतून कोणत्याही प्रकारचा सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, भावनिक प्रक्षोभ होणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. गल्लाभरु प्रवृत्तीपेक्षा समाजातल्या चौथ्या शक्तीचे आपण शिल्पकार आहोत हे त्यांनी लक्षात घ्यावे व शेवटी घरातले संस्कार हे असतातच व दूरदर्शनचा रिमोट कंट्रोल शेवटी आपल्या हातात असतो, निर्मात्याच्या नव्हे!

सौ. मोनिका दिलीप कुवर

कुवर निवास, प्लॉट नं. १०, अंबरनाथ स्टेशन जवळ,

अंबरनाथ (जि. ठाणे)

• • •

## असंच असतं !

असंच असतं !
असंच असतं !
वळण-वळण 'चकवा' देतं
फसवं 'मृगजळ'!
.... तर कधी 'हिरवळ'
कडाक्याचं हिव...
वाळूंच वादळ
असंही असतं ...
नि
तसंही असतं....
वाट धुंडाळीत
चालायच असतं

श्री. वासुदेव जगन्नाथ हजारे
ठाणे.

# "स्त्री - पुरुष समान आहेत का ?"

*'स्त्री व पुरुष समान आहेत का' हा फार सनातन प्रश्न ! याचं उत्तर वर्तमान काळाच्या भिंगातून शोधायला हवं, इतिहासातून धडे घ्यायला हवेत, म्हणजे दोघांनीही बदलायला हवं, समान भूमिकेवर यायला हवं - संपादक*

त्या दिवशी आमच्या मित्रमैत्रिणींच्या घोळक्याला अगदी 'डिबेटिंग क्लबचे' च स्वरुप आलं होत. वादविवाद बराच रंगला होता. अर्थात विषयच तसा होता - 'स्त्री-पुरुष समान आहेत का ?' एक मित्र म्हणाला,' तुम्ही मुली मूर्ख असता. तुम्हाला वाटतं की जीन्स-टीशर्ट घातला, बॉयकट केला की आपण झालो मुलगा. पण शेवटी बायका त्या बायकाच.' मी म्हटलं, ' खरोखरीच पँट-शर्ट घालून मुलगा होता आलं असतं तर या जगातील एकही शहाणी स्त्री क्षणभर देखील स्त्री राहू इच्छिणार नाही. विनोद जाऊ दे पण जर तू खरोखरीच तू म्हणतोस तसं मुलींना वाटत असेल की पँट-शर्ट घालून, बॉयकट करुन आपल्याला पुरुष होता येईल तर त्या खरोखरीच मूर्ख असल्या पाहिजेत. कारण आदर्श ठेवायचा तो सिंहाचा. गाढवांशी काय बरोबरी करायची ?'

दुसरा तयार होताच. तो म्हणाला, ' तू काहीही युक्तिवाद कर. पण पुरुष हा स्त्रीपेक्षा सरसच आहे.' मी म्हटलं,''काही बाबतीत तो सरस आहे तर काही बाबतीत स्त्री. आणि जो खरोखरीच श्रेष्ठ असतो तो आपल्यापेक्षा कनिष्ठ लोकांनाही आदराने वागवतो, आपुलकी दाखवतो. तुम्ही पुरुष स्त्रियांपेक्षा खरोखरीच श्रेष्ठ असता तर तुम्हाला येता-जाता स्त्रीला खाली पाहयला लावण्यात तिच्यावर सतत कुरघोडी करण्यात अशी कीक् मिळालीच नसती.'' क्षणभर गप्प बसून तो म्हणाला,''पण हा तर निसर्गाचा नियम आहे की सबल दुर्बलांना खाणार, त्यांच्यावर वर्चस्व गाजवणार म्हणून.'' ह्याच तत्वावर वागायचं ठरवल तर आपल्याला फार तर एखाद जंगल निर्माण करता येईल, विचारी, सुसंस्कृत आणि प्रगल्भ माणसांचा समाज नाही. आणि मानवी संस्कृतीचा स्त्री हा पाया आणि पुरुष म्हणजे कळस हे खरं आहे अस गृहीत धरलं तरी हे लक्षात का येत नाही की पाया जितका भक्कम, भरीव आणि उंच तितका कळस सुरक्षित आणि उंच उभा राहू शकेल म्हणून ?' मी.

''उलट स्त्रीच सरस असते. पुरुषापेक्षा. तुम्ही पुरुषांनी आम्हाला वर्षानुवर्षे परंपरेच्या, संस्कृतीच्या खोट्या बंधनात जखडून गुलामासारख वागवलं. आता कुठे आम्हाला काही करायची संधी मिळतेय, आमची प्रगती होतेय हे पाहून तुमचा पुरुषी इगो नुसता दुखावला नाही आहे तर धास्तावलाय, हो की नाही ?' एक मैत्रिण.

मी म्हटलं, '' पुरुषांनी स्त्रीला गुलामगिरीत ठेवल हे खरं. पण त्याला तितकीच जबाबदार स्वत: स्त्रीदेखील आहे. कारण NO ONE CAN MAKE YOU SMALL WITHOUTYOUR CONSENT अस म्हणतात ते काही खोटं नाही. शिवाय स्त्री ही पुरुषापेक्षा सरसही नाही की हीनही नाही. झाशीची राणी स्त्री होती, पण 'ध' चा 'मा' करणारी आनंदीबाई ही देखील स्त्रीच होती ना . स्त्री-पुरुष दोघही सर्वस्वी भिन्न आहेत. पण ते एकमेकांना पूरक (Complementary) आहेत आणि म्हणूनच ते समान आहेत. पण इतकी वर्ष झालं काय की पुरुष स्वत:च्या सामर्थ्यांचा फाजील आत्मविश्वासामुळे स्त्रीला कमी लेखत आला आणि स्त्री ही भावनाशीलतेच्या अवाजावी आहारी गेल्यानं वैचारिक शक्ती गमवून दयनीय अवस्थेत राहिली. आता स्वत्व जागृत झालेली स्त्री अन्यायामुळे दुखावली गेली, डिवचली गेली आणि तिनं परंपरागत बंधन झुगारुन बंडखोरी केली तर ह्यात दोष कुणाचा ?'

''करा, करा ना बंडखोरी करा'' एक मित्र जरासा

वैतागून म्हणाला, " पण तुम्ही स्त्री आहात हे न विसरता, आपली मर्यादा न सोडता. एकीकडे स्त्रीवादी भूमिका घ्यायची आणि राहायचं, वागायचं ते पुरुषासारखं. म्हणजे तुम्हा स्त्रियांना तुमच्या स्त्रीत्वाचा एक प्रकारचा न्यूनगंड आहे हेच तुम्ही सिद्ध करता की नाही ?"

"पण जगातल्या सर्व थोर लोकांमध्ये जास्त म्हणजे जवळजवळ नव्वद टक्के पुरुषच आहेत. स्त्रियांच प्रमाण नगण्यच आहे. हे कस काय ?" एकानं मुद्दा काढला. मी म्हटलं, ' हो आहेत ना, पण जगातल्या पुरुषप्रधान समाजात एक पुरुष असण हा किती मोठा प्लस पॉईंट असतो हे मी तुला सांगायला नको. स्त्रीकडे प्रत्येक क्षणी, प्रत्येक बाबतीत फक्त एक स्त्री, एक दुय्यम वस्तू म्हणून बघितल गेलं. तिचं माणूसपण नाकारलं जात होतं. अशावेळी ती आपल कर्तृत्व दाखवणार तरी कशी होती? आणि हे विसरु नकोस की स्त्रीनं चूल आणि मूल सांभाळण्याच दुय्यम काम सांभाळल तेव्हाच पुरुषाला बाहेर जाऊन कर्तृत्व दाखवता आलं. आणि महत्त्वाची गोष्ट अशी की थोर माणसं मग ती पुरुष असे की स्त्री हे लिंगभेद, जात-पात, धर्म, देश, नाती-गोती ह्या क्षुद्र गोष्टींचा फार पलिकडे असतात. ते फक्त गुणवान असतात. एवढच एक सत्य असतं. शिवाय विवेकानंद एखादाच असतो. एक विवेकानदं बाकीचा सगळा आनंदीआनंद काय ? '

" पण मग तुम्हाला राखीव जागा कशाला हव्या असतात. नोकरीत, राजकारणात. तेव्हा मग स्त्री असण्याचा फायदा का घेता ?" एकजण म्हणाली. " मी स्वतः राखीव जागेच्या विरोधातच आहे. आम्हा स्त्रियांना कुणाच्या मेहरबानीनं नव्हे तर स्वतःच्या मेहनतीनं, कर्तृत्वान मोठं व्हायला हवं"

"अगदी बसमध्ये सुद्धा तुम्हाला राखीव सीटस् असतात." तो कुत्सितपणे म्हणाला.

" तुम्ही पुरुष गर्दीचा फायदा घेऊन धक्के मारणार नसलात तर कुठल्याही तरुण, धडधाकट स्त्रीला गर्दीत उभे राहून प्रवास करायला काहीच वाटणार नाही." मी म्हटलं.

मित्रवर्ग असा गप्प झाला होता. त्यांच्याकडे काही प्रश्न न उरल्यामुळे असेल किंवा माझ्या उत्तरांमुळे त्यांच समाधान झाल्यामुळे असेल कदाचित. पण त्यांच्या चेहऱ्यांवरुन एवढं स्पष्ट होत की मी जे बोलले ते त्यांना कळलयं, थोडसं पटलयं, पण ते वळायला जड जाणार होत म्हणून.

स्त्रीला स्वातंत्र्य, समानता दिली की ती आपल्याला डोईजड होणार ह्या कल्पनेनं धास्तावलेल्या तमाम पुरुषवर्गाला मी एवढचं सांगू इच्छिते की आम्हाला Equality हवी आहे Superiority नाही. तुम्ही पुरुष म्हणजे काही देव नाहीत आणि आम्ही स्त्री म्हणून आमच्या चुकांना, दोषांना क्षमा नाही आणि आमच्या गुणांना किंमत नाही आणि पुरुषाला मात्र सर्व काही माफ अस होता कामा नये. एवढीच आमची रास्त अपेक्षा आहे. एखादी स्त्री ही पुरुषापेक्षाही अधिक गुणवान, कर्तबगार असू शकते ह्याचा पुरुषांना मत्सर किंवा न्यूनगंड वाटता कामा नये. स्त्रियांनीदेखील आता आपल्या 'पतली कमर, तिरछी नजर' च्या परंपरागत पण कालबाह्य साधनांनी पुरुषांना मोहवण्याचा, त्याला ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न न करता गुण आणि विचार ह्यांची प्रयत्नपूर्वक कास धरुन आपलं व्यक्तिमत्त्व संपन्न करायला हवं. तरच ही आपलं स्वतःच हक्काचं स्वतंत्र अस स्थान निर्माण करु शकेल. शेवटी स्त्री काय किंवा पुरुष काय दोघांच हित एकमेकांनी सहाय्यक, मित्र बनण्यातच आहे. प्रतिस्पर्धी नव्हे. आणि म्हणूनच दोघांचही ध्येय स्त्री-पुरुष अशा संकुचित चौकटीतून बाहेर पडून अधिकाधिक चांगला माणूस बनण हेच असावं.

**वर्षा गटणे**

अ/३०२, विनायक सोसायटी, मीठबंदर रोड, ठाणे.

• • •

# मराठी भाषेचा इतिहास : काही विचार

मराठी भाषेचा इतिहास पाहण्यापूर्वी पार्श्वभूमीपर असे काही विचार लक्षात घेणे आवश्यक आहे म्हणताना आपण भाषेचा इतिहास म्हणतो व अभ्यासताना साहित्याचा विचार करतो याचे कारण भाषेचा इतिहास समजावून घेण्याचे साहित्य हे माध्यम असते. मात्र वाङ्मय इतिहासाच्या या अभ्यासात पारंपरिक पद्धतीमुळे अनेक त्रुटी व प्रश्न निर्माण झालेले असतात त्यातील काही म्हणजे :-

१) अभ्यासकास उपलब्ध होईल तितकेच ग्रंथ साहित्य (लिखित वा प्रकाशित आहे) आहे असे समजणे बरोबर आहे का ?.

२) मौखिक परंपरेचा प्रभाव असणाऱ्या भारतीय जीवनात मौखिक पद्धतीने आविष्कृत होत राहिलेल्या व पिढ्यांगणिक बदलत राहिलेल्या साहित्याचे काय?

३) हस्तलिखित स्वरुपातील पोथ्या मुद्रणपूर्व हस्तलिखिते यामध्ये झालेल्या परिष्करणांना मान्यता द्यावी काय ? अशी मान्यता दिल्यास मूळ ग्रंथकाराचा आविष्कार कसा अबधित राहू शकेल?

४) मराठीपुरता विचार करावयाचा झाल्यास यादव काळा पासून ते १९व्या शतकापर्यंत बरेचसे साहित्य लिहिणारे लेखक हे एकासारखे दुसऱ्याचे नाव असणारे होते त्यामुळे ज्ञानेश्वर किती ? तुकाराम किती? या सारखे साहित्य बाह्य प्रश्न हा वाङ्मयीन इतिहासाचा विषय व्हावा का? कारण समाजाने आज सर्व मान्य केलेले तुकाराम गाथा ज्ञानेश्वरी असे ग्रंथ नेमके कोणत्या ग्रंथकाराचे होते यावर विद्वानांमधे चर्चा होत राहते.

५) वाङ्मयाच्या किंवा भाषेचा इतिहास म्हणजे नेमके काय? कारण आजवर झालेल्या अभ्यासात प्रामुख्याने कोणता ग्रंथ कधी लिहिला गेला, त्या ग्रंथात काय आहे? त्या ग्रंथाच्या कर्त्याचे चरित्र काय होते, हे व या सारखे वर्णन केले जाते. एखद्या कवीचे जीवन चरित्र अभ्यासणे हे त्याच्या साहित्य कृतीच्या संदर्भात आवश्यक असले तरी केवळ त्याचे चरित्र हा वाङ्मय इतिहास होऊ शकतो का?

६) भारतीय भाषा व वाङ्मयाचा इतिहास पाहाता आपल्याला असे जाणवते की, ग्रंथनिर्मिती व ग्रंथकर्ते यांचा फक्त कालिक आढावा घेतला जातो. साहित्याने भाषा किंवा भाषाने साहित्य कसे प्रभावित होत गेले याचा ढोबळ अंदाज यामुळे येऊ शकतो, परंतु याचा सूक्ष्मविचार मात्र होत नाही. त्यामुळे समाज जीवन, त्यातील बदल, त्या अनुषंगाने साहित्यात आढळणारे प्रवाह यांचा ऐतिहासिक आढावा घेणे खरे तर आवश्यक असते.

७) ग्रंथगत साहित्य किंवा ग्रंथरुपाने प्रकाशित झालेले साहित्य हाच प्रामुख्याने इतिहास विषय असतो या व्यतिरिक्त विशेषत: गेल्या दोन शतकात नियतकालिके, दैनिके यातून आलेले साहित्य वृत्तलेख कार्यक्रमातून केली जाणारी भाषणे, घेतले जाणारे परिसंवाद आदींचा देखील साहित्य म्हणून विचार करणे गैर ठरेल काय?

साहित्याचा इतिहास अभ्यासताना विद्यार्थ्यांनी वरील सर्व मुद्दे मनात ठेवणे आवश्यक असते अन्यथा साहित्याचा इतिहास म्हणजे ग्रंथनिर्मितीचा इतिहास असे ढोबळ समीकरण विद्यार्थ्यांच्या मनात रुजेल ते तसे रुजावयाचे नसेल तर साहित्य व भाषा यांचा नेमका अर्थ स्पष्ट करुन त्या दोहोंचा इतिहासाच्या सीमारेषा कशा आहेत हे विद्यार्थ्यांना मराठी शिकवताना समजावून सांगणे आवश्यक आहे. इतका व्यापक दृष्टिकोण ठेवल्यास वाङ्मय इतिहासाच्या आभ्यासास वेगळे परिणाम प्राप्त होते.

**प्रा. मोहन पाठक.**
ग्रंथपाल, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

•••

# ।। वीर असे फाकडा ।।

*मराठ्यांच्या इतिहासाचा व्यासंग असणारे श्री. अरुण ठाकूर यांचा मराठे शाहीतील सन्मानाच्या पदव्यांबद्दलचा हा छोटा लेख वाचून या संबंधी अधिक माहिती मिळविण्यास वाचकांनी प्रवृत्त व्हावे यासाठी लेख देत आहे. - संपादक*

ओठावरती मिरवी भरदार मिशीचा आकडा ।
रणांगणी शिलेदार वीर असे फाकडा ॥

असे शाहीर कवनांमधून शूर लढवय्यांचे - योध्दांचे आवेशपूर्ण वर्णन केलेले आढळते. जो अत्यंत पराक्रमी असतो, कुठल्याही संकटाला बेधडक न डगमगता सामोरा जातो, व विजश्री खेचून आणतो, रणांगणांत हाराकीरी करतो अशा निधड्या छातीच्या अत्यंत शूर वीराला 'फाकडा' असे म्हणतात. बिकट प्रसंगी आपल्या प्राणाची पर्वा न करता बेडरपणे मुकाबला करतो त्याला 'फाकडा' हे विशेषण लावले जाते. त्याचा तो 'बुहमान' समजला जातो.

त्याचा नोकझोकही तेवढाच रुबाबदार असतो. रणांगणात ऐन लढाईत अचानक होणाऱ्या हल्ल्यावर अथवा होणाऱ्या कोंडीमध्ये लगेच विचार करुन क्षणात योग्य निर्णय घेण्याची कुवत त्याच्यात असावी लागते. अथवा राजकारणात अत्यंत कठीण अशा प्रसंगावर मात करुन योग्य निर्णयाची अम्मलबजावणी करुन सर्व व्यवहार सुरळीत पार पाडता येण्याची ताकद असावी लागते. शक्ती व बुद्धीचा योग्य मेळ ज्याला बसवता येतो त्याला 'फाकडा' असे म्हणण्याचा प्रघात आहे. हुशारी ज्याच्या वागण्याबोलण्यातून प्रत्ययास येते, दिसून येते व वाहुतून शौर्य प्रत्ययास येते असे वीर 'फाकडे' होत.

पेशवाईत मराठेशाहीमध्ये सखारामबापू हे पेशव्यांचेदिवाण होते, भोसल्यांचे दिवाण देवाजीपंत चोरघडे हो होते. विठ्ठलसुंदर हे निजामाचे दिवाणजी होते. त्यामुळे त्यांना 'शहाणे' म्हणून मानत असत. पेशव्यांचे फडणीस हे नाना फडणवीस होते. ते त्यांच्या मुलकी विषयात अत्यंत हुशार असले तरी लष्करी विषयाचे अंग नसल्यामुळे त्यांना 'अर्धे शहाणे' म्हणत. पेशवाईतील हेच ते प्रसिद्ध 'साडेतीन शहाणे' होत. या साडेतीन शहाण्यांमध्ये अर्ध्या शहाण्याने तीन शहाण्यांवर मात केली होती.

तसेच 'राव' ही पदवी मिरविण्याची पद्धत त्या काळी होती. तशाच योग्यतेच्या व्यक्तीस 'राव' म्हणून संबोधिले जाई. भवानराव-प्रतिनिधी, गोपाळराव पटवर्धन आणि मुरारराव घोरपडे यांना 'रावाचा' बुहमान मिळाला होता. त्याच प्रमाणे थोरल्या माधवरावांना 'अर्धेराव' मानले जायचे. त्या काळात गोपाळराव नाईक तांबवेकर हा स्वतः स्वतःलाच 'राव' पदवी लावून मिरवू लागला. शिवाय त्याने पालखी वापरावयास सुरवात केली. ही गोष्ट भवानराव प्रतिनिधी यांचे कानावर गेली. त्यांनी माणसे पाठवून त्याची ती पालखी पार मोडून तोडून टाकली. शिवाय गोपाळराव नाईक तांबवेकरला ठार मारले. <u>अकार्यक्षम असलेल्याने खोट्या पदव्या धारण करुन मिरविणाऱ्यांना हे असे शासन व्हावयास पाहिजे.</u> ज्याला 'राव' अशी पदवी मिळालेली असेल त्यालाच पालखीचा मान मिळत असे. म्हणजे त्याला पालखी वापरण्याचा अधिकार प्राप्त होत असे. 'राव' ही पदवी पालखीशी संबंधित होती. येराग़बाळ्याने पालखी वापरणे हा त्या पदवीचा व पदवीधारकाचा अपमान होत असे.

थोरल्या बाजीरावापासून नावात 'राव' शब्द आलेला आहे. पेशवे माधवराव यांचे नावात 'राव' होते. पेशव्यांना तर पालखी वापरण्याचा अधिकार होता. साडेतीन शहाण्यांमधील अर्ध्या शहाण्याप्रमाणे पेशवे माधवरावांनी या तीन रावांवर मात केलेली आहे. म्हणून अर्धेराव झाले. जसे साडेतीन शहाणे तसेच हे साडेतीन राव प्रसिद्ध झाले. रणांगणांत गाजविणाऱ्या, प्राणपणाला लावून अत्यंत बिकट प्रसंगी बेडरपणे मुकाबला करणाऱ्या अशा शूर लोकांमध्ये

तीन 'फाकड्यांचा' उल्लेख सापडतो.

कन्हरखेडच्या शिंदे घराण्यातील मानाजी फाकडे हा उमदा तरुण रघुनाथरावांच्या पक्षातील होता. तो अत्यंत शूर, उर्मट तसेच बेधडक कसलाही विचार न करता संकटात उडी घेणार होता. सरदारी या मानाजी फाकडेलाच मिळावी यासाठी रघुनाथरावांनी प्रयत्न केले होते. परंतु थोरल्या माधवराबांमुळे हे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाही. घाशीराम कोतवालाने केलेला अन्याय याने उघडकीस आणला आणि त्यास शिक्षा करण्यास भाग पाडले. राज्यहितापेक्षा स्वहिताला तो जास्त महत्त्व देत असे. रघुनाथरावांच्या कारस्थानात त्याचा मोठा पुढाकार असे. दुसऱ्या बाजीरावास पेशवे पद मिळवून देण्यास याने बरीच मदत केली. १७७८ च या युद्धात त्याने फारमोठी शौर्याची कमाल केली. त्यामुळे त्याला 'फाकडा' अशी पदवी मिळाली. तेव्हापासून मानाजी शिंदे ऐवजी 'मानाजी फाकडे' असे सर्वत्र ओळखू लागले. अवाढव्य ओबडधोबड शरीराच्या मानाजी फाकडेकडे कोणाचेही लक्ष चटकन वेधले जात असे. कमरेवरील शरीर सर्व उघडे असायचे. खांद्यावर दुपट्टा टाकलेला असे. छाती व हात यावर पिवळ्या-पांढऱ्याशुभ्र गंधाचे भले मोठे पट्टे ओढलेले असत. ढालेवार टेकलेले अवाढव्य शरीर आणि त्याची राकट मुद्रा पाहून थरकाप होत असे.

निजाम व मराठे यांच्यात झालेल्या युद्धात सतत तोफांचे गोळे बरसत असूनही कान्हेरराव फाकडेने मोठ्या धैर्याने तोंड दिले. आणि आपल्या सैन्यातील सहकाऱ्यांच्या मदतीने शौर्य गाजवून सोन्याची अंबारी लुटून आणली. कुकडी नदीच्या परिसरात बुसी या इंग्रजाने ग्रहणाच्या दिवशी अचानक हल्ला करून पेशव्यांची देवपूजेची सोन्याचांदीची भारी किमतीची भांडी लुटली. हे पाहून कान्हेररावानी बुसीवर हल्ला चढविला. युद्धात त्याने शौर्याची फार मोठी कमाल केली आणि लुटलेली सर्व चिजवस्त् परत मिळविली. त्याच्या या पराक्रमाची पेशव्यांनी स्तुती करून 'फाकडा' हा किताब देऊन त्याचा सन्मान केला. त्याने केलेल्या या बहादुरीबद्दल त्याला त्याच्या घोड्याच्या पायात चांदीचा वाळा घालण्याची मुभा दिली. तेव्हापासून तो 'कान्हेरराव फाकडा' म्हणून ओळखला जाऊ लागला. पुढे होळी हुन्नुरच्या लढाईत फार मोठा पराक्रम गाजवून आपले रणकौशल्य दाखविले. यात मोठ्या कष्टाने वाचला होता. परंतु पुढे सावनूरच्या युद्धात तोफेच्या गोळ्याने मारला गेला. त्याच्या मरणाच्या बातमीने पेशव्यांना फार दुःख झाले. त्याच्या बहादुरीबद्दल त्याच्या वंशास इनाम दिले गेले.

रघुनाथराव इंग्रजांना जाऊन मिळाले. आपणास पेशवेपद मिळण्यासाठी मदत करण्यास सांगितले. त्याची विनंती मान्य करून इंग्रजांनी त्यांना मोठा फौजफाटा देऊन मराठ्यांविरुद्ध लढण्यास रवाना केले. त्यात स्टुअर्ट नांवाचा इंग्रज सेनाधिकारी होता. त्याला रस्त्यांची व घाटमार्गाची चांगली माहिती होती. तळेगाव दाभाड्यापासून बोरघाटापर्यंत मराठ्यांचे सैन्य युद्धासाठी सज्ज होऊन बसले होते. मराठ्यांची युद्धाची एवढी मोठी तयारी पाहून सुद्धा न डगमगता स्टुअर्टने मोठ्या हिंमतीने जोरदार धडक मारून खंडाळ्याच्या घाटावर निशाण लावले. मराठ्यांच्या तोफांचा जोरदार मारा चालू असतानाही त्याची पर्वा न करता स्टुअर्टने आपली फौज कार्ल्यापर्यंत नेऊन पोहोचविली. याच युद्धात ४ जानेवारी १७७९ मध्ये मराठ्यांच्या तोफेचा गोळालागून स्टुअर्ट ठार झाला. त्याच्या या हिंमतीचा व शौर्याचा मराठ्यांवर एवढा प्रभाव पडला की त्यांनी 'इष्टुर फाकडा शाबास' म्हणून त्याची स्तुती केली. शौर्य, धैर्य व युद्ध कौशल्याबद्दल त्याचा 'गुणगौरव' मराठ्यांनी केला. लढाव म्हणजे लढवय्या असे नांव दिले. मराठे हे शत्रूच्याही शौर्याची प्रशंसा करीत. हीच हिंदू संस्कृति. जगातील ही अशी एकमेव संस्कृती!

**श्री. अरुण ठाकूर**
अरुण दर्शन, म. गांधी पथ, नौपाडा, ठाणे.

• • •

# पेटलेल्या पाण्याचा धगधगीत इतिहास- वडवानल

कोकणात राहून अध्यापन करणाऱ्या राजगुरु आगरकर यांची नौदलाच्या बंडावरील 'वडवानल' ही कादंबरी काहीशा दुर्लक्षित विषयावरील. परंतु 'मॅजेस्टिक' सारख्या ख्यातनाम प्रकाशनानं काढली ही कौतुकाची गोष्ट आहे. उद्या नौदलाच्या बंडाचा जर अभ्यास करायचा झाला तर या कादंबरीचा संदर्भ घेतल्याशिवाय पुढं जाता येणारच नाही. देवरुख येथे या कादंबरीवर झालेल्या परिसंवादातील अध्यक्षीय भाषणाचा हा सारांश - संपादक

घर माझे शोधाया मी - वाऱ्यावर वणवण केली
जे दार खुले दिसले ते - आधिच निखळले होते
एकटाच मी त्या रात्री -आशेने तेवत होतो
मी विझलो तेव्हा-आकाश उजळले होते

सुरेश भटांच्या या ओळी जेव्हा 'वडवानल' कादंबरी वाचली तेव्हा आठवल्या.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पन्नास वर्षांनी नौसैनिकांच्या बंडावर कादंबरी आली. स्वातंत्र्याची दिव्य पहाट उजाडण्यापूर्वी क्रांतिकारकांचे भगिरथ प्रयत्न, राष्ट्रीय नेत्यांचे प्रयत्न, आझाद हिंद सेना, आणि अखेरच्या प्रयत्नात 'घाव घाली निशाणी' ठरलेला नौसेनेच्या बंडाचा घाव हे सारं भारतीयांनी पाहिलं.

स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वातंत्र्य इतिहासाची अनेक पारायणं सांगणारी अनेक पुस्तकं आली. सगळ्यांनी आपल्या त्यागाची पुरेपुर वसूली केली. परंतु राजगुरु आगरकरांची खंत वेगळीच होती. नौसेनेच्या बंडातील सैनिकांची साधी दखलही कुणी घेतली नाही. उपेक्षेने मारल्या गेलेल्या या सैनिकांची ही कैफियत. राष्ट्रीय लढा वर्णन करत असताना गोविंद तळवलकरांसारखा इतिहासप्रेमी संपादकही एखादं प्रकरण न खर्ची घालता दहा-बारा ओळीतच हा लढा संपवतात. आगरकरांना याची खंत होतीच. शिवाय स्वतःच ते नौसेनेत 'ऑपरेटर' होते. बंडातील सहभागी लोकांशी संवाद साधून, उपलब्ध साहित्याचा अभ्यास करुन या सगळ्या घटनांची त्यांनी कादंबरी केली. त्या कादंबरीच्या यशापयाचा हा आढावा.

### कादंबरीचं कथानक

नौसेनेतील अनेक सैनिक. राज-गुरु-मदन-दत्त या चौघांची दोस्ती. हे चौघेजण पोरकिड्यांनी भरलेलं जेवण, गॉडफ्रे, रॉटर अशा इंग्रज अधिकाऱ्यांकडून मिळणारी वागणूक, बास्टर्ड, हंग्री डॉग्ज, ब्लडी पिग्ज अशा शेलक्या शिव्या, याविरुद्ध असंतोष पसरवून त्यांनी राष्ट्रप्रेमी नौसेनिकांची एक फळी तयार केली. उठावाची योजना बनवली. गांधीजींच्या अहिंसक मार्गावरचा विश्वास केव्हाच उडाला होता. आझाद हिंद सेनेतील लोकांवर ठेवलेल्या आरोपांचा संताप होताच. सुभाषबाबूंचा तिन्ही दलांनी बंड करायला हवं असा जो संदेश होता तो या सैनिकांनी अंतःकरणावर कोरला. उठाव करताना प्राणप्रिय भारतीय नौदलाचं नुकसान होणार नाही हे त्यांनी पाहिलं.

नौदलाचा गाजणारा दिन ...... ब्रिटीश सरसेनापती ऑचिनलेक याची भेट तळावर. बोटीवर कडक पहारा.... चळवळे सैनिक पहारा चुकवून जळजळीत पत्रकं लावतात. बंडांचं निशाण फडकलं. सगळ्या बोटींवर बातमी पोचली. उद्रेकाची. शेरसिंग नावाच्या क्रांतिकारी नेत्यानं 'रामदास व दत्त' या दोघांना हाताशी धरुन इंग्रज अधिकाऱ्यांच्या जुलमी आणि उर्मट सत्तेला धैर्यानं बंडाचं निशाण फडकावून ब्रिटीश साम्राज्याला आव्हान दिलं. इंग्रज अधिकारी गॉडफ्रे-रोटरे-किंग आदी बंड चिरडण्याचा आटोकाट प्रयत्न

करतात. बातम्या देशभर पसरतात. सर्वत्रच संतापाची लाट... मुंबई बंदरात सैनिकांच्या मदतीसाठी गरिब-श्रीमंतांच्या मदतीसाठी लागलेल्या रांगा.... हवाई दल-भारतीय भूदल यांचीही बंडाची असहकाराची भाषा... मग मुंबईलाच युद्धभूमीचं रुप येतं.

परंतु सत्तेचा विचार करणाऱ्या सरदार पटेल-मौलाना आझाद यांनी इंग्रजांशी सल्लामसलत करुन बंड फोडलं. नौसैनिकांना कुणीच पाठिंबा दिला नाही. सैनिकांच्या हिताची, त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता आम्ही घेऊ अशा कॉंग्रेसजनांच्या आवाहनानं, भारतीय नौदलांच संभाव्य नुकसान ओळखून मोठ्या दुःखी अंतकरणान बंड मागे घेतलं जातं. आणि तद्नंतर बंडखोर सेनेचे नेते स्वातंत्र्यानंतर वाऱ्यावर पडतात इथं कादंबरी संपते.

## कथानक आणि तंत्र

ही कादंबरी वाचकाला खिळवते कारण तिचं आकर्षक कथानक. आगरकरांनी व्यक्तिरेखा जिवंत केल्या आहेत. कथानकात उपकथानकांचा मोह लेखकाने टाळला आहे. वैचारिक मतभेदांचे सुंदर दर्शन घडवून देण्यात लेखक यशस्वी ठरलाय. नाट्यपूर्ण प्रसंग रोमहर्षक करण्याचा प्रयत्न लेखकानं केलाय. कॉंग्रेसच्या नेत्यांनी आपली आश्वासनांची पूर्ती केली नाही ही आगरकरांची खंत जागोजाग जाणवते. आझाद हिंद सेना आणि खादीधारी स्वातंत्र्य सैनिक यांच्या लढ्यात जमिनअस्मानाचा फरक आहे. नौदलाचे सैनिक आणि आझाद हिंद सैनिक यांचा त्याग खादीधारी सैनिकांपेक्षा जास्त मोलाचा आहे. असं लेखकाचं व्यक्तिगत मत आहे. लेखकानं या सगळ्या घटना कादंबरी तंत्रात बसवण्याचा चांगला स्तुत्य प्रयत्न केलाय. कादंबरी ही निदान 'तंत्र' म्हणून जमलेली वाटते.

## ऐतिहासिक कादंबरी

'वडवानल' कादंबरी मराठीतल्या गाजलेल्या लोकप्रिय कादंबऱ्याप्रमाणं ऐतिहासिक कादंबरी म्हणता येईल का हा प्रश्न पडतो. (छावा, श्रीमान योगी-स्वामी प्रमाणं) कालपरवाच्या घटना आपण वर्तमान म्हणून वाचतो. मग राजकारण असलं तरी ते वर्तमान असतं. म्हणजेच कालपरवाच्या राजकारणाचा 'इतिहास' होतो. तर पूर्वदिव्य ज्यांचे भावी रम्यकाल अशा पुराणप्रिय माणसांना ३००/४०० वर्षांपूर्वी घडलेल्या घटना मनोरंजक रंजक वाटतात.ह.ना. आपटेंची 'वज्राघात' कादंबरी पहिली ऐतिहासिक कादंबरी म्हणून गाजली. त्यानंतर स्वामी, छावा, श्रीमान-योगी अशा कादंबऱ्यांची मागणी वाढायला लागली. स्वामी कादंबरीनं नवा इतिहास, मानदंड दिला.

वडवानल कादंबरी इतिहासावर नवा प्रकाश टाकते. कारण ऐतिहासिक कादंबरी सत्याचा अपलाप करु शकत नसते. ऐतिहासिक कादंबरीला इतिहासाचं नव्यानं मूल्यमापन करावं लागतं. मानवी नात्यांचा विस्तृत पट दाखवून त्याचा वेध घ्यावा लागतो. प्रत्येक प्रसंगात एक चित्ताकर्षकपणा आणावा लागतो. इथं या कादंबरीत तसा वाव नसल्यानं आपणाकडे ऐतिहासिक कादंबऱ्यांची मापे आणि साचे ठरलेले आहेत. अशा पार्श्वभूमीवर या साच्याला नवं वळण देण्याचं काम 'वडवानल' कादंबरीनं केलं आहे.

## समकालीन इतिहास

समकालीन इतिहासाचं विश्लेषण करणारी कादंबरी म्हणून वडवानल आहे का ? याचा विचार करताना दोन कादंबऱ्या पटकन् डोळ्यासमोर येतात. 'रारंगढांग' आणि 'रणांगण' आणि ग.प्र. प्रधानांची गाजलेली कादंबरी 'साता उत्तराची कहाणी' या कादंबऱ्यांची कथानके भिन्न आहेत. रारंगढांग मध्ये भव्य अक्राळ-विक्राळ निसर्ग आणि हिमालय आणि त्याच्या विरुद्ध प्रशासन, बांधकाम खातं

या सगळ्यांना मानवी पातळीवर आणू पाहणारा विश्वनाथ नायक अन् त्याचा अयशस्वी लढा, 'रणांगण' या बेडेकर यांच्या कादंबरीतील दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरच्या घबराटमय वातावरणातील बोटीवरच्या प्रवासातील राजकारणाचा वेध घेत घडलेली चक्रधर हॅर्टा यांची प्रेमकहाणी आहे. तर ग.प्र. प्रधानांनी 'साता उत्तराची कहाणीत' चार मित्रांचा पत्रव्यवहार फारच सुंदर मांडलाय. त्यातून त्या वेळच्या राजकारणाचा पट उलगडला जातो तसाच सगळी मानवी मूल्ये आणि समाजजीवनाचं प्रतिबिंब कादंबऱ्यातल्या पत्रांतून पडलयं. या कादंबऱ्याची आठवण इथं येण्याचं कारण म्हणजे या कादंबऱ्यांची कलात्मक मूल्ये फार वेगळी आहेत. या कादंबऱ्यांच्या पार्श्वभूमीवर वडवानलचा आढावा घेतला तर लढ्यातील घटनांचा वेग चांगला पकडलाय, उपकथानके न ठेवता सुगमपणा आणलाय. परंतु वरील कादंबरींच्या आसपासही जाता येईल असं विश्लेषण करण्यात लेखकाला पुरतं अपयश आलंय. एकसंध कलात्मक असा परिणाम साधण्याचा लेखकाचा प्रयत्न फसलाय.

**कादंबरीचं अपयश**

कादंबरीत कथानकाचा वेग पकडताना खूप त्रुटी जाणवतात. सुजाण वाचकाला या त्रुटी अस्वस्थ करतात.

१) अन्न आणि नोकरीतल्या सेवासुविधांवर अनेक पानं खर्ची पडली आहेत. या सेवासुविधांबाबतचा संताप वेगवेगळ्या पद्धतीनं परत परत येतो. समजा इंग्रजांनी या सेवासुविधा लगेच पुरवल्या असत्या तर बंडाला कारणच उरलं नसतं.

२) कादंबरीत सतत वावरत राहणारं, आपल्या अस्तित्वाबाबत गूढ निर्मा करणारं पात्र म्हणजे शेरसिंग, या शेरसिंगचा नंतर 'आगापिछा' काहीच लागत नाही. बरं त्या काळात १९४५ ते १९४७ दरम्यान असा कोणी क्रांतिकारक वावरत होता का? याचाही पत्ता लागत नाही.

३) सुरुवातीला गुरु आणि खान यांच्याबाबतचा प्रसंग वगळला तर लेखक वेगवान कथानकाच्या प्रेमात पडलाय असं वाटतं. नाती किंवा पात्रातील सहसंबध फार तपशिलानं येत नाहीत.

४) इंग्रज अधिकारी कडवे शिस्तप्रिय म्हणून येतात पुढे त्यांना 'मन' नावाची काही चीज आहे अथवा असू शकते, त्या अधिकाऱ्यांची निरीक्षणं यापैकी कशाचाच पत्ता लेखकानं लागू दिलेला नाही.

**कादंबरी वाचताना सतत जाणवत राहतं की अन्न द्यायला लागलेली रांग-जनतेची मदत हे कौटुंबिक थाटाचे प्रसंग कशासाठी? अत्यंत घाण अन्न, अत्यंत अवमानकारक वागणूक एकूणच बंडाला प्रवृत्त करणारं वातावरण निर्माण केलं जावं हे न समजायला इंग्रज इतके दुधखुळे होते का ? अगदी कुत्रासुद्धा खात नाही असं अन्न द्यायला ते वेडे नव्हते. हे प्रसंग तर्कसुसंगत वाटत नाहीत.**

कादंबरीच्या आशयाच्या अंगाकडनं जसं आपण पाहिलं तसं काही गाळांतरे लेखकानं उगाचच सोडलीत असं वाटतं. पटेल, बॅ. जीना हे केवळ स्वार्थसाधू नेते नव्हते. त्यांच्या कृतींना अर्थ असायचा. त्यांची स्पष्ट मनोगते येत नाही. निदान अरुणा असफअलींची भूमिका 'जेल डायरी' स्टाईलला आणता आली असती.

**कादंबरीत जाणवणारा भाग म्हणजे लेखक पुनरावृत्तीच्या प्रेमात पडलाय. खान, मदन, दत्त यांचा इंग्रज अधिकाऱ्यांसमोरचा उमंटपणा इतका वाढलाय की त्यांचं उमंटपणाचं वागणं इतकं तपशिलानं येत राहतं की लेखक स्वतःच त्यात रमलाय. नाना पाटेकरच्या संवादासारखं ते लांबलचक झालं आहे.**

या कादंबरीत काही पारिभाषिक शब्दांचा उलगडा हवा होता. उदा. 'फॉलीन', 'ल्गॅंग मार्च', 'नॉटीकल मैल'

वगैरे. नकाशावर भारतीय नौदल त्याची रचना, ही ठिकाणे कुठून किती लांब आहेत याचा पत्ता नकाशे असते तर लगेचच लागला असता. सर्वसामान्य वाचक काही नौदलाशी परिचित नसतात. डी.एस.पी. पेक्षा इन्स्पेक्टर मोठा मानणाऱ्या विस्तृत वाचक वर्गाला पारिभाषिक शब्द आणि नकाशांची गरज आवश्यक होती.

वडवानल कादंबरी ऐतिहासिक आहे की नाही? तिच्यातील राहून गेलेल्या त्रुटी आदी सगळ्या चर्चा या अखेर अभ्यासकांच्या पातळीवरच्या राहतात. कोकणातील एका लेखकाची मॅजेस्टिकसारख्या दर्जेदार प्रकाशनाने कादंबरी, दुर्लक्षित विषयावरची प्रकाशित करावी यातच लेखकाचा गौरव आहे.

**श्री. गजानन पळसुले-देसाई**

रायपाटण,जि. रत्नागिरी.

• • •

## रोपटं

वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचा

फोटू

साहेबांच्या केबिनमध्ये

लॅमिनेट करून लावलाय....,

साहेब काय भारी दिसत होते

झारीने पाणी टाकताना

आणि गर्दीही बरीच होती

टाळ्या वाजवायला...

अगदी झकास आहे

ते रोपटं मात्र जगलं

नाही...

आताहे काम आपल्या हातातं
असतं होय?

नाही जगलं...

तो प्लॉटम्हणे साहेबांच्या

नातेवाईक बिल्डरला ॲलॉट
झाला

अन

बांधकामाच्या रगाड्यात ते

रोपटं....,

**-निशीकांत खापरे**

पारसिक नगर, खारीगाव, ठाणे

• • •


## ।। दिशा ।।

*आपण ही दिशासाठी लिहू शकता.*

*विषय हवा असेल तर संपर्क साधा. आपल्या लेखनाचा निश्चितच विचार होईल*

*-कार्यकारी संपादक*

# पुस्तक परिचय



शालेय जीवनात संस्काराचे असणारे महत्त्व पूर्वापार सर्वजण मान्य करीत आले आहेत. शासनाने मूल्यशिक्षणाचे महत्त्व जाणून शालेय जीवनात मूल्य शिक्षणाचा केलेला पुरस्कारही यादृष्टीने महत्त्वाचा आहे. या संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांनी काय वाचावे, कसे व का वाचावे याबद्दलही विविध लेखकांनी त्यांच्या परीने विचार करुन केलेली निर्माण पुस्तकेही बाजारात आहेत. चांगले विचार मनावर बिंबवतील अशी ही पुस्तके कमी महत्त्वाची नाहीत. परंतु, शासनाने अनिवार्य केलेल्या मूल्य शिक्षणाचा गाभा लक्षात घेऊन एकत्रितपणे पहिल्या इयत्तेपासून दहावीपर्यंत मूल्य संवर्धन करु शकते असा संच मराठीत नाही.

ही उणीव लक्षात घेऊन ठाण्याच्या संस्कृती प्रकाशनाने संस्कारप्रदीप या नावाने महाराष्ट्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित दहा पुस्तके प्रकाशित केली आहेत. या पुस्तकातील साहित्याचे लेखन व संकल्पन/संपादन यांचा दर्जा अतिशय स्पृहणीय आहे. त्यामुळे ही पुस्तके शाळा शाळांमधून लावली जावीत. विद्यार्थ्यांकडून वाचून घेतली जातील हे पाहणे महत्त्वाचे आहे.

सर्व पुस्तकातील साहित्याचा एकत्रित विचार करण्यापूर्वी या सर्व पुस्तकांच्या मुखपृष्ठांबद्दल लिहिणे अगत्याचे आहे. मुखपृष्ठे कोणी बनवली आहेत त्याचा उल्लेख नाही. परंतु, सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारी सर्व भारतीय धर्मांची चिन्हे दोहोंबाजूस व मध्यभागी प्रज्वलित दीप असे मुखपृष्ठाचे स्वरुप आहे. यातील दीप महत्त्वाचा. कारण सर्व धर्मांची शिकवण अंधारातून उजेडाकडे जाण्याची आहे व ते या दीपातून उत्तम रीतीने सूचित होते.

पहिली ते दहावीच्या या दहा पुस्तकात त्या त्या वयोगटानुसार साहित्याचे उत्तम संकलन केले गेले आहे. इसापनीती, रामायण आदी पूर्वापार चालत आलेल्या साहित्यातील समर्पक उतारे निवडून त्यांना साजेशी, आकर्षक चित्रे वापरून पुस्तके तयार करण्यार आली आहेत. या पुस्तकांचे पद्धतशीर अध्यापन करण्याच्यादृष्टीने महत्त्व फार आहे. यातील एकेक पाठ वाचून समजावून सांगत मूळ साहित्याशी विद्यार्थ्यांची नाळ जोडता येईल. अवांतर वाचन नाही, या कारणाने विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आज बरीच उणीव असलेली लक्षात येते. ही उणीव दूर करुन वाचनाची आवड निर्माण करणे, ती जोपासणे हे मूल्य संवर्धना बरोबरच शक्य आहे.

आठवी पर्यंतच्या पुस्तकात त्या मूल्याचे महत्त्व मनावर बिंबवीणाऱ्या पाठाचे वाचन झाल्यावर त्यातील मथितार्थ 'महत्त्व' सांगून विद्यार्थ्यांपुढे आणला आहे. हा मथितार्थ किंवा सार पालक व शिक्षक अधिक कुशलतेने विद्यार्थ्यांकरिता वापरु शकतात. जीवन शिक्षणाचा तो आदर्श पाठ ठरतो. नवव्वीतील पुस्तकाची रचना वयोगटाप्रमाणे थोडी वेगळी आहे. त्यात एकूण भारतीय संस्कृतीसंबंधी काही पाठ, काही चरित्र पाठ आहेत. तर दहावीच्या पुस्तकात १८ पाठांतून भगवद्गीता समजावून सांगितली आहे. गीता जीवन कसे जगावे हे सांगणारा आदर्श ग्रंथ आहे. आपल्याकडे तो निवृत्ती नंतर म्हणजे

जगून संपल्यावर वाचला जातो. हे चुकीचे आहे. दहावीच्या वयातच गीतेचा संस्कार आवश्यक आहे. या दृष्टीने हे पुस्तक फार महत्त्वाचे आहे. या पुस्तकांच्या संशोधन व संपादन करणाऱ्या ज्याआक्का(घाणेकर) यांनी त्यांची भूमिका प्रत्येक पुस्तकात थोडक्यात दिली आहे.

सर्व पुस्तकांची मिळून जी सर्वसामान्य वैशिष्ट्ये आहेत ती म्हणजे पुस्तकांची निर्मिती उत्तम आहे. भाषा सरळ मनाला भिडेल अशी आहे. मात्र कवितांची निवड करताना कवींची नावे असणे आवश्यक होते असे जाणवते. तसेच पाठ कोणत्या ग्रंथातील, ग्रंथातील कल्पनेवर आधारित आहे त्याचाही खुलासा असता तर अधिक चांगले झाले असते.

कोणत्या वयात माणसाने काय वाचावे, का वाचावे, वाचनाचा व्यक्तिमत्त्वावर परीणाम होतो तो लक्षात घेऊन कसे वाचावे इ. मुद्दे लक्षात घेता या पुस्तकांत प्रत्येक वयोगटात असणाऱ्या मुलांनी वाचावीत अशा पुस्तकांची यादीही देता येईल. अर्थात या त्रुटी नसून या पुस्तकांच्या पुढील आवृत्तीत संस्कृती प्रकाशनाने लक्षात घ्याव्यात यासाठी केलेल्या सूचना आहेत.

आदरणीय पांडुरंग शास्त्री आठवले, संघाच्या शाखांतून केले जाणारे संस्कार व साने गुरुजी व राष्ट्र सेवादलाच्या शिबिरात केले जाणारे संस्कार याचे मनोज्ञ मिश्रण या पाठातून झाले आहे. भारतीयत्व, भारतीय संस्कृती व मनुष्य धर्माचा संस्कार व्हावा यासाठी ही पुस्तके घराघरात पोहोचायला हवीत.

<u>संस्कार प्रदीप</u> - भाग १ ते १० संस्कृती प्रकाशन ठाणे.
प्रकाशन वर्ष २००१
मूल्य (१० पुस्तकांचे मिळून) २३६७ /-फक्त
<u>संपर्क पत्ता</u> - प्रेषित घाणेकर, ३, ऋचा सोसायटी, हाजुरीदर्गा रोड, ठाणे-४०० ६०४.

•••



# पुस्तक परिचय -२

'व्हायरस' या शब्दाचा सर्वसामान्यांना माहीत असणारा शब्दकोशामधील अर्थ 'विषाणु' असा आहे. मात्र संगणक प्रसाराच्या आजच्या युगात जेव्हा 'कॉम्प्युटर व्हायरस' हे शब्द सामान्य माणूस ऐकतो तेव्हा अनेक प्रकारचे प्रश्न त्याच्या मनामध्ये येतात. निर्जीव संगणकामध्ये सजीव (!) विषाणु शिरू शकतोच कसा हे कोडे त्याला पडते. एकूणच संगणकाचा वाढता वापर होत असलेल्या आजच्या काळात संगणकामुळे भाषेच्या संदर्भात वापरले जाणारे प्रयोग, नवनवीन शब्द, शब्दांच्या भाषांतराच्या हव्यासातून निर्माण होणारे शब्द या सर्वांबाबत अनेक गैरसमज निर्माण होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर इंग्रजीत अनेक अंगोपांगांवर सातत्याने लेखन होते. पुस्तके येत रहातात याचाच परिपाक म्हणजे मराठीतही अलीकडे नवीन अभ्यासपूर्ण पुस्तके येत आहेत. विशेषतः मुलुंडच्या संगणक प्रकाशनाने प्रकाशित केलेली पाच सहा पुस्तके ही मराठीत या विषयाच्या साहित्यात पडलेली महत्त्वपूर्ण भर आहे. श्री. माधव शिरवळार यांच्या या पुस्तकांमधील अलिकडे आलेले नवे पुस्तक म्हणजे 'कॉम्प्युटर व्हायरस : स्वरूप आणि उपाय' हे होय !

हे संपूर्ण पुस्तक वाचनीय, संग्राह्य व संदर्भासाठी अतिशय उपयुक्त ठरणारे झाले आहे. यामागे महत्वाचे कारण म्हणजे श्री. माधव शिरवळकर यांच्या भाषेत अतिशय सोपे पणा, ओघ आहे. त्यांची विषय मांडण्याची अशी खास शैली आहे. वृत्तपत्रांमध्ये संगणक या विषयावर त्यांचे सदर लेखन चालले आहे. त्यामुळे संगणक विषयी साहित्य वाचणाऱ्या मराठी वाचकांना त्यांची शैली परिचित आहे.

संगणकात व्हायरस शिरतो म्हणजे काय होते, तो व्हायरस नेमका कसा असतो, त्याचा इतिहास काय आहे, प्रकार काय आहेत, व्हायरस संगणकात शिरला तर संगणकाच्या हार्ड डिस्कवर असणाऱ्या डेटामध्ये काय होऊ शकते, या संदर्भात वापरले जाणारे परिभाषिक शब्द कोणते आहेत, व्हायरस शिरू द्यायचा नसेल तर काय करायला हवे, शिरला तर काय करावे .... अशा या संदर्भातील सांगोपांग माहितीचा आढावा या पुस्तकात आहे. अशा स्वरुपाची पुस्तके लिहिताना ती अधिक माहितीपूर्ण करण्यासाठी सादर करावयाच्या माहितीच्या मांडणीत तर्क शुद्धता असावी लागते. अशी तर्क शुद्ध मांडणी ही या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल. एकूण १६ प्रकरणांमधून श्री. शिरवळकर यांनी विषय मांडला आहे.

व्हायरसच्या उत्पत्तीची माहिती पहिल्या प्रकरणात आहे. यातील टेन कमांडमेंटस्, अर्थात दहा कानमंत्र हे प्रकरण विशेष महत्त्वाचे आहे. यात संगणक व्हायरस मुक्त ठेवायचा असेल तर मूलभूत असे कोणते नियम पाळायला हवेत त्याची माहिती आली आहे. डेटाच्या बॅक अप घेण्यापासून ते डिस्कच्या वापरापर्यंत सर्व दहा बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. संगणक प्रकाशनाने या दहा नियमांचा तक्ता बनविल्यास अनेक ठिकाणी तो तक्ता डोळ्यासमोर लावून ठेवता येईल.

व्हायरसच्या इतिहासात (पृ.३६) १९९७ ते २००१ या काळात घडलेल्या सर्व महत्त्वाच्या घटना दिलेल्या आहेत. लाहोर मध्ये १९८६ साली दोन भावांनी बनवलेला व्हायरस, रिचर्ड स्क्रेंटा ने बनवलेला व्हायरस, अँटी व्हायरसची निर्मिती करणारे पीटर नॉर्टन इ. बद्दल अतिशय उद्बोधक माहिती या प्रकरणात आलेली आहे.

या पुस्तकाची जी खास वैशिष्ट्ये आहेत त्यात पृ. ११७ वरील व्हायरस संबंधीच्या साईटस्‌चे प्रकरण हे खास वैशिष्ट्य आहे. या वेब साईटसची चित्रे, पत्ते यामुळे जिज्ञासूंना इंटरनेटवरून माहिती काढता येते शक्य झाले

आहे. पुस्तकामधील विषय अतिशय तात्विक असला तरी योग्य त्या चित्रांचा उत्तम वापर केलेला असल्याने पुस्तक वाचताना कंटाळवाणे होत नाही.

मात्र तात्विक विषयावरील मराठी भाषेतून लिहिल्या जाणाऱ्या अनेक ग्रंथांमध्ये आढळणारी उणीव अनपेक्षित रित्या जाणवली. पुस्तक लिहिताना संदर्भासाठी म्हणून वापरलेल्या इंग्रजीतील महत्त्वाच्या ग्रंथांची संदर्भ सूची देणे हे देखील आवश्यक होते. ग्रंथनिर्मितीच्या तांत्रिक दृष्टीनी निर्मिती अतिशय व्यवसायिक, उत्तम आहे व मराठीत प्रथमच इतक्या चांगल्या पद्धतीने हा विषय मांडला गेला आहे. त्या दृष्टीने संगणक वापरणाऱ्या प्रत्येक मराठी भाषिकाला उपयुक्त ठरणारे असे हे पुस्तक आहे. मुखपृष्ठ ही विषयानुसार अचूक व आकर्षक झाले आहे.

कॉम्प्युटर व्हायरस : स्वरूप आणि उपाय

लेखक : श्री. माधव शिरवळकर

संगणक प्रकाशन, मुलुंड, २००१

पृष्ठे : १२८

मूल्य : रु. ११०/ - फक्त

---

दोन्ही परिचयांचे लेखक

**प्रा. मोहन पाठक**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

ठाणे.

• • •

## हे आपल्याला माहीत हवं

२३ एप्रिल २००१ ते २२ एप्रिल २००२ हे वर्ष केंद्र शासनाने राष्ट्रीय पुस्तक वर्ष म्हणून घोषित केले आहे. Books for All, All for Books असे घोषवाक्य या वर्षासाठी जाहीर झाले आहे. या वर्षात आपण पुस्तकांसाठी काही केले असेल तर अवश्य कळवा. पुस्तक वर्ष या संकल्पनेचा प्रसार करणारे चित्र-



# राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा - काही विचार

महाराष्ट्रातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा सप्टेंबरच्या सुमारास संपन्न होतात. वक्तृत्वाची, विचारांची परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रात आज या स्पर्धा पूर्वीसारख्या खरोखरच महत्त्वाच्या राहिल्या आहेत काय ? त्या दृष्टीने हे काही मुद्दे - संपादक

महाराष्ट्र ही वक्त्यांची भूमी आहे. आणि विशेषतः सप्टेंबर हा तर वक्तृत्व स्पर्धांचा महिना. या महिन्यात सबंध राज्यभरात अनेक वक्तृत्व स्पर्धा होतात. अनेक विद्यार्थी या स्पर्धेमधून भाग घेतात, आणि अनेक पारितोषिकेही वितरित केली जातात.

सध्या दूरदर्शनवर आपण अनेक स्पर्धा पहातो. गायन स्पर्धा, अभिनय स्पर्धा, नृत्य स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धा, प्रश्नोत्तर स्पर्धा यांसारख्या अनेक स्पर्धा हरघडी चालू असतात. या स्पर्धांमधून बक्षिसेही भरपूर मिळतात. कौन बनेगा करोडपती, जीतो छप्पर फाडके यांसारख्या स्पर्धा तर तुम्हाला कोट्याधीश होण्याची स्वप्ने दाखवतात. या स्पर्धांना दर्शकवर्ग भरपूर मिळतो. बक्षिसांच्या आशेने स्पर्धक भरपूर मिळतात. स्पर्धकांना बक्षिसे भरपूर मिळतात. आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे संयोजकांना जाहिराती भरपूर मिळतात. एकूण काय सगळा 'भरपूर'चा मामला. एकदम प्रोफेशनल ! दूरदर्शनवर झळकण्याची संधी शेवटी कोणाला नको असते ?

मात्र या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातल्या वक्तृत्व स्पर्धांची परिस्थिती मात्र आशादायी नाही.

अनेक राज्यस्तरीय वक्तृत्व गेल्या काही वर्षांमध्ये कोलमडून पडल्या आहेत. अनेक स्पर्धांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. वक्तृत्व स्पर्धेपेक्षा संगीत, गायन या स्पर्धांकडे सगळ्यांचा कल असतो. एकूणच वक्तृत्व स्पर्धांचा जोर ओसरल्यासारखा वाटतो.

याचे पहिले कारण बक्षिसे ! दूरदर्शनवर तुम्ही भरपूर बक्षिसे मिळवू शकता. काही तासातच कंगाल माणूस करोडपती होऊ शकतो. दूरदर्शनवरती झळकणे हेच अनेकदा लोकांना पुरेसे पारितोषिक वाटते. पण वक्तृत्व स्पर्धा यापैकी काहीच देत नाहीत. ज्याप्रमाणे संगीत स्पर्धा, गायन स्पर्धा हा चांगला 'टाईमपास' होऊ शकतो तसा वक्तृत्व स्पर्धा होऊ शकत नाहीत. वक्तृत्व स्पर्धा हे वैचारिक व्यासपीठ आहे. पण विचार करायला आवडते कोणाला?

दुसरे कारण, वक्तृत्व स्पर्धांचे नियोजन. वक्तृत्व स्पर्धांचा सेटअप अजूनही तोच पारंपरिक आहे. बदललेल्या युगाबरोबर जुळवून घेता न आल्यामुळे वक्तृत्व स्पर्धांना वाईट दिवस आले आहेत. हल्लीचे युग जाहिरातीचे आणि व्यावसायिक आहे. वक्तृत्व स्पर्धांना सुद्धा या मार्गाने जावेच लागेल. योग्य विषय ठरवून, त्याची चांगली प्रसिद्धी करून, आकर्षक बक्षिसे जाहीर करून स्पर्धा अत्यंत व्यावसायिक तऱ्हेने घडवून आणल्या पाहिजेत. मात्र सध्या परिस्थिती अतिशय उलट आहे.

अनेक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा या राज्यस्तरीय नाहीतच. काही स्थानिक स्पर्धक भाग घेऊन स्पर्धा पडवतात. स्पर्धा ही त्यांच्या त्यांच्यातच होते. कधीकधी तर हाताच्या बोटावर मोजण्या इतके स्पर्धक असून सुद्धा स्पर्धा होतात. व्यवस्थित नियोजनाचा अभाव जाणवतो. अनेकदा स्पर्धा घ्यायच्या म्हणूनही घेतल्या जातात. ज्याने देणगी दिली आहे त्याच्या समाधानासाठी स्पर्धा राबवल्या जातात. अर्थात वक्तृत्व स्पर्धा या सामाजिक संस्थांनी किंवा

महाविद्यालयांनी चालवलेल्या असतात आणि त्यांचा हेतू हा वक्ते घडविणे हा असतो, पैसा कमाविणे हा नव्हे. सध्या ज्या स्पर्धा अनेक दशके चालू आहेत त्या स्पर्धा फार पूर्वी पासूनच अत्यंत व्यावसायिक दृष्टीने चालवल्या जातात. स्पर्धेच्या संयोजकांनी मेहनत घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पातळीशी योग्य असे विषय निवडले गेले तरच त्यातून विचारांना चालना मिळू शकते.

तिसरा मुद्दा आहे स्पर्धांच्या विषयां संदर्भात. स्पर्धांचे अलिकडले विषय हे अनेकदा राजकारणाच्या उथळपास घोटाळणारे दिसतात. आणि सामाजिक विषय हे संथ, एखाद्या घटनेपाशी रेंगाळतात. अर्थात त्याला विद्यार्थीही कारणीभूत आहेतच. स्पर्धेतील विषय गंभीरच असले पाहिजेत असे काही नाही. पण एकूणच वक्तृत्व स्पर्धांच्या प्रतिमेमुळे स्पर्धांचे विषय हे अत्यंत जड व गंभीर पद्धतीने मांडले जातात. विषयाच्या माध्यमातून एखाद्या समस्येची चर्चा होते आहे किंवा एखाद्या समस्येचा उहापोह होतो आहे असे क्वचितच दिसते. केवळ चर्वित चर्वण किंवा काथ्याकूटच चाललेला दिसतो. कदाचित वक्तृत्व स्पर्धांच्या सेटअप मुळेच स्पर्धक विषयांना बिचकतच हात घालत असावेत. सद्य परिस्थितीच्या संदर्भातले वैविध्यपूर्ण (आणि अर्थातच अभ्यासनीय) असे विषय असल्यास ती स्पर्धा ऐकणे हा आनंदाचा भाग होऊ शकतो.

नंतरचा मुद्दा आहे परीक्षकांसंदर्भात. बहुतेक वक्तृत्व स्पर्धांना प्राध्यापक हेच परीक्षक असतात. म्हणून स्पर्धेचे खरे परीक्षण होतच नाही. वेगवेगळ्या व्यवसायांमधली मंडळी स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून आल्यास वेगवेगळ्या दृष्टिकोनातून वक्तृत्वाची परीक्षा होऊ शकते. मात्र यासाठी आयोजकांनी मेहनत घ्यावी लागते. तेथेच तर आयोजकांची बोंब आहे. परीक्षकांसंदर्भात सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा की, परीक्षक हे स्वतः अतिशय उत्तम असे श्रोते असले पाहिजेत. वक्तृत्वामधील डावे उजवे त्यांना निवडता आले पाहिजे. आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी स्वतः अभ्यास केला पाहिजे.

चौथी समस्या आहे विद्यार्थ्यांच्या बाबतीत. जसा नेपोलियनच्या शब्दकोशात अशक्य हा शब्द नव्हता तसा स्पर्धकांच्या शब्दकोशात मेहनत हा शब्द नसावा असे वाटते. खरेतर ज्या स्पर्धा आपण दूरदर्शनवर पहातो त्या मेहतन विलक्षण घ्यावी लागते.

सध्या प्रसारमाध्यमांचा प्रभाव विलक्षण वाढलेला आहे. इतका वाढलेला आहे की प्रसारमाध्यमांचीच मते ग्राह्य धरली जात आहेत. अनेक विद्यार्थीही अनेकदा प्रसारमाध्यमांची मते व्यक्त करताना दिसतात. स्वतःचा अभ्यास म्हणजे काय हे त्यांना कळतच नाही. स्वतःची विक्री वाढावी म्हणून लोकप्रियतेच्या मागे लागलेल्या प्रसारमाध्यमांच्या हातून काय कप्पाळ विचार मंथन होणार? अनेकदा स्पर्धांचे विषयही प्रसारमाध्यमांच्या दृष्टिकोनातून घेतले जातात. वक्तृत्व स्पर्धा याच खरेतर विचारांची प्रसार माध्यमे झाली पाहिजेत, पण तसे होत नाही. हाच तर प्रश्न आहे.

विद्यार्थ्यांच्या संदर्भात दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, भावना आणि विचार यांच्यात स्पर्धकांना सांगड घालणे कठीण झाल्याचे दिसते. एकतर जहाल, जळजळीत, भडक, कडक किंवा अतीच अभ्यासू असा प्रकार कानांवर पडतो. यातला सुवर्णमध्य गाठता आला पाहिजे.

विद्यार्थ्यांचा स्पर्धेकडे पहाण्याचा जो दृष्टिकोन आहे तोही वक्तृत्वस्पर्धांना मारक आहे. स्पर्धांची जी पारंपरिक प्रतिमा आहे त्यामुळे स्पर्धांमधून जड भाषांमध्येच बोलले पाहिजे अशी स्पर्धकांची धारणा आहे. स्पर्धकांची भाषा घेतल्याच्या विषयाशी, शैक्षणिक पातळीशी (आणि अर्थातच आपल्या वयाशी) अनुरुप असावी लागते..

असो, सध्याचे जग हे विपणन व जाहिरातीचे आहे.

या जगामध्ये गायन, वादन किंवा अभिनयापेक्षा वक्तृत्वच निभावून नेऊ शकते. वक्तृत्वस्पर्धांना आणि विशेषत: वक्तृत्वाला कधीच मरण नव्हते आणि आजही नाही. पण इतर स्पर्धांच्या भपक्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा थोड्या मागे पडल्या आहेत. त्यांना पुन्हा एकदा बरे दिवस येतील अशी आशा करायला हरकत नाही.

**वासुदेव देशपांडे**

भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे.

• • •

## ☺ चुटके ☺

रोहीत : डा. साब मेरी पत्नी ने पेट्रोल पी लिया है । और वो सारे घर मे चक्कर लगा रही है ।

डाक्टर : चिंता मत करो जब पेट्रोल खत्म हो जाएगा वो अपने आप रुक जायेगी ।

****

भिखारी : ''भगवान के नाम कुछ दे दो बाबा''

एक आदमी : पहले तो तुम मंदिर के पास बैठते थे ना ? तुमने वो जगह क्यों छोड दी ?

भिखारी : वो जगह मैने अपने जवाई को दहेज में दी है ।

## ✳ आगामी चंद्रग्रहणे ✳

| क्रम | वर्ष | तारीख/महिना | प्रकार | क्रम | वर्ष | तारीख/महिना | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००२ | ५ जुलै | P | १४ | २०१० | २१ डिसेंबर | T |
| २ | २००३ | १६ मे | T | १५ | २०११ | १५ जून | T |
| ३ | (२) | १ नोव्हेंबर | T | १६ | २०११ | १० डिसेंबर | T |
| ४ | २००४ | ४ मे | T | १७ | २०१२ | ४ जून | P |
| ५ | (२) | २८ ऑक्टोबर | T | १८ | २०१३ | २५ एप्रिल | P |
| ६ | २००५ | १७ ऑक्टोबर | P | १९ | २०१४ | १५ एप्रिल | T |
| ७ | २००६ | ७ सप्टेंबर | P | २० | २०१४ | ८ ऑक्टोबर | T |
| ८ | २००७ | ३ मार्च | T | २१ | २०१५ | ४ एप्रिल | T |
| ९ | (२) | २८ ऑगस्ट | T | २२ | २०१५ | २८ सप्टेंबर | T |
| १० | २००८ | २१ फेब्रुवारी | T | २३ | २०१७ | ७ ऑगस्ट | P |
| ११ | (२) | १६ ऑगस्ट | P | २४ | २०१८ | ३१ जानेवारी | T |
| १२ | २००९ | ३१ डिसेंबर | P | २५ | २०१८ | २७ जुलै | T |
| १३ | २०१० | २६ जून | P | | | | |

# धर्माचे जपानमध्ये स्थान

मुंबई विद्यापीठातून प्रथम वर्गात एम्. ए. (अर्थशास्त्र) ही पदवी मिळवल्यावर पद्मिनी तांबे-माहूरकर चार वर्षे सोफाया कॉलेजमध्ये अर्थशास्त्राच्या व्याख्यात्या म्हणून काम करत होत्या. नंतर लंडनच्या इंपीरियल कॉलेजमधून त्यांनी एम्.एस्. (फायनान्स) ही पदवी मिळवली. सध्या त्या टोकिओत रहात असून 'भांडवली गुंतवणूक' या विषयावर इच्छुक व्यक्तींना व्याख्यान्याद्वारे माहिती देतात. मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद वांदोडकर महाविद्यालयाच्या प्रा. उषा तांबे यांनी केला आहे. - *संपादक*

ऑगस्ट महिना संपायला आला आहे. मला मुंबईची फार आठवण येत आहे. 'गणपती बाप्पा मोरया'च्या गर्जनांनी आसमंत भरुन गेले असेल. अनेक ध्वनिक्षेपकांमधून एकाच वेळी सूर-बेसुरांचा संमिश्र कोलाहल ऐकू येत असेल. परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांसाठी ते सर्व असह्य होत असेल. मी मात्र पुन्हा एकदा या उत्सवाला मुकणार आहे. माझा योग असा, की या मला आवडणाऱ्या सणाच्या वेळी नेमकी मी इंग्लंड किंवा जपान सारख्या बेटांवर अडकलेली असते!

मुंबईतल्या माझ्या वास्तव्यातला सर्वांत आकर्षक भाग म्हणजे गणेशोत्सव! गणेशचतुर्थीला सकाळी दादरच्या कबुतरखान्यापाशी जाऊन गणेशमूर्ती घेऊन यायची; घरी आल्यावर साग्रसंगीत पूजा, आणि नंतर इष्टमित्र-नातेवाईकांच्या बरोबर मोदकाचे जेवण! आमच्या हाजी-अली सरकारी वसाहतीत सार्वजनिक गणेशोत्सव अगदी जोषात साजरा व्हायचा. जवळच्या कॉलेजमधला हॉल आम्हाला 'विविध-गुण दर्शन' आपापली 'कला' दाखविण्यासाठी मिळत असे. सातव्या दिवशी निघणारी विसर्जनाची जबरदस्त मिरवणूक, सगळ्यांनी मिळून समुद्राकाठी म्हटलेली आरती, आणि साश्रू नयनांनी गणपतीला दिलेला निरोप..... किती मौल्यवान आहेत या आठवणी! इथे मात्र माझ्या मुलीला हे काहीच मिळत नाही. ज्या असंख्य संस्कारांनी माझ्या आयुष्याचे धागे विणले गेले, ते तिच्या आयुष्यात मी कुठून आणू? आपल्या स्वत:च्या देशात वाढतांना ज्या प्रखर अस्मितेची आपल्याला जाणीव होते, ती तिच्यासारख्या परक्या देशात वाढणाऱ्या मुलांना कधीतरी होईल का? आम्ही इथे दसरा-दिवाळी साजरे करतो. रांगोळ्या, फटाके, पक्वान्नांचं भारतीय जेवण, रेशमी साड्या, झब्बा-पैजामा-असं सगळं वातावरण निर्माण केल्यावर सुद्धा मनाला हुरहूर लागतेच! आणि मग लक्षात येतं, की धुराने आणि आवाजाने प्रदूषित झालेल्या मुंबईच्या हवेत श्वास घेतल्याखेरीज दिवाळी दिवाळी वाटतच नाही.

खरोखर, भारतामध्ये आपल्या आयुष्याचा किती भाग धर्माने व्यापलेला असतो! त्याचे बरे-वाईट परिणामही आपण भोगत असतो. माझ्या कॉन्व्हेंटमधील शिक्षणामुळे मी ख्रिसमस साजरा करीत असे, आणि एका मुस्लिम मैत्रिणीमुळे ईदसुद्धा. परंतु धर्मांमुळे आपल्या समाजात किती ताण-तणाव निर्माण होतात, याची मला पूर्ण जाणीव आहे. पण इथे जपानमध्ये लोकांचा असा समज आहे, की भारतासारख्या 'धर्मपरायण' देशामध्ये सर्व जनता शांततापूर्ण सहजीवन जगत असेल. माझ्या एका जपानी मैत्रिणीला तर आपल्याकडच्या धार्मिक दंग्यांबद्दल ऐकून फारच नवल वाटलं. भारताबद्दल इकडे तसे अनेक गैरसमज असतात. परंतु जपानच्या आजच्या समस्या या त्या समाजाला दृढ धार्मिक पाया नसल्यामुळे निर्माण झाल्या आहेत, हे अनेक जपानी नागरिकांचं मत आहे.

जपानमधील धर्मांबद्दल मी आजवर जे पाहिलं-ऐकलं, ते असं -या देशात अनेक धर्म आहेत पण कुठल्याही धर्माचे कडवे समर्थक नाहीत. जपानचा मूळ धर्म शिंटो;

बौद्धधर्माच्या आगमनानंतर तो काहीसा मागे पडला. पण लवकरच दोन्ही धर्म सुखाने एकत्र नांदू लागले. त्यांचं मिश्रणच झालं. इथले इतर दोन धर्म आहेत ख्रिश्चन आणि कन्फ्युशियन धर्म. साधारणपणे जपानी लोक जन्मसंस्कार शिंटो पद्धतीने, विवाह संस्कार ख्रिश्चन पद्धतीने आणि मृत्यू नंतरचे संस्कार बौद्ध पद्धतीने पाळतात. परवाच मी बी.बी.सी.वर एकेलं, बिहारमधील बोधगया इथे बुद्धाचा एक प्रचंड पुतळा उभारणार आहेत. अमेरिकेतील स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याच्या पाच पट त्याचा आकार असेल. आणि बुद्धाच्या केसांच्या एका गाठीखाली सहा फूट उंचीचा माणूस उभा राहू शकेल. २००५ साली ही प्रचंड मूर्ती पूर्ण होणार आहे. जपानी पर्यटकांसाठी ते मोठचं आकर्षण ठरणार आहे.

त्यावरून जपानमध्ये मी पाहिलेल्या बुद्ध मूर्तींची आठवण झाली. 'मेमॉयर्स ऑफ ए गेईशा' यांच्याबद्दल खूप कुतूहल वाटू लागलं होतं. अर्थात् टोकियोमधे हे सगळं अदृश्यच झालं आहे. किमोनो घातलेली जपानी स्त्री इथे क्वचितच दिसते. कामावर जाताना, गाडी चालवतांना किमोनो अडचणीचाच होतो हे खरं, पण साडी तरी कुठे सोयीची पडते? आणि तरी आपल्याकडे या जीन्स-टॉप्सच्या जमान्यातसुद्धा, साड्या आणि सलवार-कमीझ आपलं साम्राज्य टिकवून आहेतच ना ?

तर, 'जुनं' जपान बघण्यासाठी त्यांची सांस्कृतिक राजधानी मानल्या गेलेलया क्योटो या गावी जायचं आम्ही ठरवलं. जपानच्या अद्भुत शिंकांसेन (बुलेट ट्रेन) ने अडीच तासात अलगद आम्हाला क्योटोत आणून सोडलं. क्योटो स्टेशन म्हणजे अभियंत्यांच स्वप्नच आहे. आकाशातली बाग भासावी असं प्रचंड तरीही सुंदर असे ते बांधकाम आहे. 'रायोकान' नावाच्या हॉटेलमधे आम्ही उतरलो होतो. अगदी काही झालं तरी हे हॉटेल पाहिलंच पाहिजे असा आमच्या अमेरिकन मित्रांचा आग्रह होता. जमिनीवर चटईसारख्या 'तातामी' होत्या. पलंगांऐवजी त्या चटयांवरच घातलेल्या जाड गाद्या होत्या. त्याशिवाय खोलीमध्ये काहीही फर्निचर नव्हतं. मला अमरावतीच्या आजीच्या घराची आठवण येत होती. पण त्यासाठी २६५ डॉलर्स रोज भरणं म्हणजे जरा जास्तच झालं होतं !

क्योटोचं मुख्य आकर्षण म्हणजे तेथील वेगवेगळी मंदिरं आणि पूजा-स्थानं. जपानच्या जुन्या राजधानीतील-नाता मधलं तोडा-जी मंदिर अगदी खास आहे. सम्राट शोमूने इ.स. ७४५ मधे ते बांधण्याची आज्ञा दिली होती. तेथे देवीची भयंकर साथ येऊन त्यात खूप लोक दगावले होते. शोमूने ही दुर्घटना स्वतःच्या पापामुळे घडली असं मानलं. प्रायश्चित म्हणून त्याने बौद्धधर्म स्वीकारला आणि बुद्धाची जगातील सर्वात मोठी ब्रॉंझ मूर्ती उभी केली. मंदिराच्या शुभारंभासाठी १०,००० पुजाऱ्यांना बोलावलेलं होतं. त्यातल्या प्रमुख पुजाऱ्याने, बोखिसेनाने, बुद्धमूर्तीचे मुद्दाम रिकामे ठेवलेले डोळे रंगवले होते. रंगाच्या ब्रशला जी दोरी बांधली होती, तिचं एक टोक राजाच्या तर दुसरं राणीच्या हातात दिलं होतं. ही बुद्धमूर्ती ४८.५ फूट उंच आहे. मूर्तीच्या हाताच्या पंजावर एकावेळी ५ बुद्ध भिक्षू उभे राहू शकतात. सोमनाथाच्या मंदिराप्रमाणे हे दाश्वुत्सु मंदिर अनेक वेळा पुन्हा पुन्हा बांधलं गेलं आहे. इथे मंदिराचा विध्वंस भूकंपांनी आणि आगींनी केला होता.

सांजू-सांगेन-दोजी मंदिर हेही आपल्याला आकर्षून घेतं. त्याचं मुख्य कारण असं की बुद्धाच्या १००१ सोनेरी मूर्तींच्या समोर गणपती, शंकर, विष्णू आदींच्या २८ मूर्ती इथे आहेत. हे देव आता स्वतःच बुद्धाचे अनुयायी झाले असून त्याच्या रक्षणासाठी इथे आले आहेत असा समज आहे. यातल्या काही बुद्धमूर्ती बाराव्या शतकात बनवलेल्या आहेत.

मी प्रत्येक शिंटो आणि बौद्ध मंदिरात गेले, दारावरची प्रचंड घंटा प्रत्येक ठिकाणी वाजवली; धूप जाळला आणि सर्व नातेवाईक-इष्टमित्र यांच्यासाठी प्रार्थना केल्या. गेल्या वर्षी युरोपमध्ये हिंडताना दिसेल त्या चर्चमधे

तेवढ्याच श्रद्धेने मी मेणबत्त्या लावल्या होत्या. धर्माचा आधार मला नक्कीच वाटतो.

क्योटोमधला आणखी एक लक्षात राहण्यासारखा अनुभव म्हणजे गिआँनच्या रस्त्यांवरील फेरफटका. गेइशांसाठी हा भाग प्रसिद्ध आहे. आम्हाला मात्र एकही गेईशा दिसली नाही. तो वर्गच हळूहळू नाहीसा होतो आहे.

क्योटोहून काही सुंदर आठवणी घेऊन आम्ही टोकिओला परतलो, पण हे ही समजून चुकलो की आता जुनं जपान पुन्हा कधीच दिसणार नाही आहे. कदाचित जपानी लोकांनाच काही जुन्या स्मृती नको असतील. एखाद्या समाजाचं वेगळपणं, त्याची आस्मिता, परंपरा ज्या अमूर्त गोष्टींनी व्यक्त होतात, त्या शोधायचा माझा प्रयत्न होता. पण जपानी गावं आणि शहरं एक सारखीच झाली आहेत. ही ह्या देशाच्या प्रगतीचीच खूण आहे. इंग्लंड किंवा युरोपमध्ये सुद्धा 'ग्रामीण' असं काही उरलेलं नाही. अगदी छोट्यातल्या छोट्या खेड्यात सुद्धा उत्तम रस्ते, वीज, पाणी पुरवठा, वैद्यकीय सोयी, डिपार्टमेंट स्टोअर्स-सगळं असतं. अर्थात् भारतात आपल्याला स्वतःला जोपर्यंत शहरी सुखसोयी मिळत असतात तो पर्यंतच- आणि त्या अंतरावरूनच-ग्रामीण संस्कृतीचं कौतुक असतं. आपल्याला विश्रांतीला तिथे जाता यावं म्हणून कुणीतरी दुसऱ्यांनी ती जतन करावी अशी आपली इच्छा असते.

यंदा मी टोकिओतच गणेशोत्सव साजरा करीन. इथल्या माझ्या नव्या मित्रमैत्रिणींना बोलावीन. पण आजूबाजूला मला मुंबईसारखे असंख्य गणपती कसे दिसणार? लोकल गाडीमधे दिसलेल्या कुणाच्या तरी टी-शर्टवर छापलेल्या गणपतीच्या चित्रावरच मला समाधान मानावं लागेल!

**पद्मिनी-तांबे-माहूरकर**
टोकिओ, जपान

• • •

भग्न स्वप्नाच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही! मानवाचे मन केवळ भूतकाळाच्या साखळदंडांनी करकचून बांधून ठेवता येत नाही! त्याला भविष्याच्या गरुडपंखांचं वरदानही लाभलेलं आहे. एखाद स्वप्न पहाणं, ते फुलविणं, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि दुर्दैवानं ते स्वप्न जरी भंग पावलं तरी त्याच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागनं धावणं, हा मानवी मनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळं!

**वि.स. खांडेकर**

अमृतवेल मधून

# संयम

एखादी गोष्ट मनाविरुद्ध झाली की आपला तोल जातो. आपण वाटेल ते बोलतो अथवा आपल्या हातून अयोग्य कृत्य घडते. संयम हा अतिशय आवश्यक असतो.

गाडीला ब्रेक ! घोड्याला लगाम ! गुरांना दावं ! हत्तीला अंकुश नसेल तर काय होईल ?

खाण्यावर संयम नसलेली अनेक माणसे आपण पाहतो. आणि त्यामुळे ती अनेक आजारांनी ग्रस्त असतात. उपास करण्यामागे हे फार मोठे कारण आहे की त्यातूनच संयम वाढतो.

रोज वेगवेगळ्या चवीचे अन्न जेवतो. पण त्यावर संयम नसल्याने अनेक व्याधींना तोंड द्यावे लागते. उपासाच्या दिवशी कितीही पंचपक्वान्न समोर आली तरी मोह न होणे तो संयम.

मनाचा, भूकेचा, तसेच वासनेचा संयम आवश्यक असतोच. आपण आपल्या इंद्रियांचे गुलाम आहोत. तर अशी शक्ती वाढली पाहिजे की इंद्रिये आपले गुलाम होतील, पण ते अतिशय अवघड आहे.

'रत्ना' च्या भेटीच्या ओढीने सापाची दोरी करुन त्यावरुन चढून तुलसी आले. पण 'रत्ना' ने हरखून न जाता त्यांना त्यांच्या कार्याची जाणीव करुन दिली. तेच पुढे संत तुलसीदास झाले.

वास, एखाद्या पदार्थाचा वास आला तर आपण तो खाण्यास उत्सुक होतो. विशेष करुन खमंग वास आला की!

जे वाईट आहे, ज्याचा आपल्या जीवनात काही उपयोग नाही अशा गोष्टी आपण बघतो, ऐकतो म्हणजेच आपल्यावर संयम नाही.

संयमाची परीक्षा सतत होत असते. आज एखादी मालिका आपण दूरदर्शनवर पाहतो, त्याचे पुढे काय? हा प्रश्न १ दिवस किंवा आठवडा सतावत राहतो, पण किती महत्त्वाचे काम असले तरी आपण पुढचा भाग चुकवत नाही. म्हणजे जेव्हा आपल्या लक्षात येते की आपण एखाद्या गोष्टीच्या आहारी जात आहोत तेव्हा वेळीच आपल्या चित्तवृत्तींना आवर घालायला हवा.

आपल्यावर संयम नसल्याने आपण आला क्षण वाया घालवतो. दिवसभर सिनेमाची गाणी ऐकतो, T.V. पाहतो; तर गाणे ऐकणे, T.V पाहणे यावर संयम नसेल तर वाईटच वळण लागते. घड्याळाचे काटे सतत पुढे धावत असतात. योग्य वेळी आपण संयम ठेवून वागलो नाही तर आपण आपल्याला वाईट वळण लावून घेतो.

ध्यानस्थ बसणे यातही संयम असतोच. आपल्याला एक पूर्ण मिनीटही स्वस्थ बसता येत नाही.

संयम हा शिकवून येत नाही अथवा सांगून येत नाही. तो स्वतःच हवा. आपणच आपल्या मर्यादा, सीमारेषा ओळखल्या पाहिजेत.

संयम नसल्याने अनेक माणसे धुम्रपान करतात. आणि शेवटी इतके इंद्रियांचे गुलाम होतात की त्याशिवाय त्यांना जगणे अवघड वाटते.

एखाद्या गोष्टींची हाव वाटणे, म्हणजेच संयमाची दुसरी बाजू म्हणजेच विरुद्ध बाजू असते. संयम नसेल तर कुठेच बंधन रहात नाही. मित्रांच्या नादाने लागणाऱ्या वाईट सवयी आपल्यावर संयम असेल तर आपले काहीच वाकडे करु शकत नाहीत.

ध्रुव जेंव्हा तपश्चर्येसाठी बसला तेंव्हा नारदमुनींनी ते कसे अशक्य आहे ते पटवून देताना सांगितले तू ज्या

झाडाखाली बसला आहेत त्या झाडाच्या पानांइतके जन्म घेतल्यावर तुला प्रभू दर्शन देतील. ध्रुवाने आनंदाने चटकन उत्तर दिले जन्म कितीही असोत पण कधीतरी दर्शन देण्याची प्रभूंनी इच्छा व्यक्त केली हे पण खूप आहे. केवढा मोठा संयम. तरीही तो ध्यानधारणेला बसला आणि त्याच जन्मी प्रभूंनी त्यास दर्शन दिले.

संयमी माणूस नेहमी स्वतःला वाईटापासून दूर ठेवतो. ज्ञानेश्वरांनी इतक्या लहान वयात जीवनाचे सार सांगितले. त्यांच्या समोर कधीही न आलेली पण त्यांच्यावर मनापासून प्रेम करणारी एक तरुणी ज्ञानेश्वर नदीवरून अंघोळ करून जाताना त्यांची जी ओलेती पावले उठत त्यावर एकेक फूल वाहून आपले प्रेम व्यक्त करत असे.

आजच्या धावत्या वेगवान युगात संयम हा जणू संपुष्टातच आलाय. साधी पिक्चरची तिकिटे मिळाली नाहीत तरी ती ब्लॅकने घेतली जातात. पण त्यासाठी दोन दिवस थांबायची तयारी नसते.

आजकाल देवळातही ५०/१०० रुपयांची रांग असते. पैसे टाकून दर्शन. परमेश्वरासाठी थोडा त्रास सोसायची आपली तयारी नसते. एखादा छोटासा आजार असेल तरी आपण दोन गोळ्या तोंडात टाकून '१५ मिनिटमें आराम. जादू नहीं किमया है ।' म्हणत कामाला लागतो पण त्या गोळ्यांचा शरीरावर होणारा दुष्परिणाम आपण लक्षात घेत नाही. घरगुती उपाय करुन दिर्घकाळ आजारापासून मुक्ती मिळवता येते.

भूक लागली तर बाहेर सर्व पदार्थ मिळतातच पण काही बनवून खाईपर्यंत वेळ नसतो. पण 'फास्ट फूड' आपल्या सेवेला असतेच. त्यासाठी 'बस दो मिनिट' म्हटले की पोटभर अन्न तयार त्यासाठी विशेष मेहनत नाही व बनवायला काय मुलंही बनवू शकतात. सेवेला मिक्सर, टोस्टर, मायक्रोवेव्ह असतातच.

पावलोपावली आपली परिक्षा असते. संयम असणे अत्यंत आवश्यक असते. आपले जीवन आपणच सन्मार्गाला नेण्यासाठी आपल्याला संयम घालून घेतला पाहिजे. बडबड, T.V., गप्पा, भांडणे, हेवेदावे, लोळणे, सतत खाणे या अनेक घटनांत घड्याळाचे काटे पुढे धावत असतात. आपण आपल्याला बंधने घालून घेतली तर अवघड असे काही नाही.

बडबड करीता इच्छीले कार्य नासे

मोती मातीत नासे....

या प्रमाणे संयम, बंधन नसेल तर आयुष्याला अर्थ उरणार नाही.

कशाचाही अतिरेक शेवटी वाईटच

बडबड करीता इच्छीले कार्य नासे

मोती मातीत नासे

मधुर पय पहा, तक्र संगे विनाशे,

माहेरी लेक नासे...

बडबड करीता इच्छीले कार्य नासे

सौ. वंदना प्रसादे

ठाणे (प.)

दूरध्वनी : ५४००६५२

•••

# परिसर वार्ता

अधिक महिन्यामुळे लवकर आलेले गणेशोत्सवाचे दिवस, वक्तृत्व, नाट्य, निबंध अशा स्पर्धांमुळे परिसरात चैतन्य, सरत्या पावसाळ्यात हिरव्या रंगाने नटलेला परिसर या पार्श्वभूमीवर दिशा साठी परिसर वृत्त सादर होत आहे. तरीही परिसर वार्तासाठी परिसरारील विविध मंडळे, विविध क्षेत्रात यश मिळविणारे 'टॉपर्स' आपल्या कार्यक्रमाची, यशांची माहिती म्हणावी त्या प्रमाणात देत नाहीत. आंतर महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठाच्या विविध स्पर्धा झाल्या, नाटकांची, एकांकिकांची तयारी जोरात चालली आहे, क्रीडा क्षेत्रातही पावसाळी स्पर्धांनी रंग भरला आहे, पण या सर्वांची तपशीलवार माहिती संबंधित विभाग दिशाला कळवत नसल्याने इच्छा असूनही त्यांची नोंद घेता येणे शक्य होत नाही.

म्हणूनच पुन्हा सर्वंना आग्रहाचे आवाहन आहे की विद्याप्रसारक मंडळाच्या सर्व घटक संस्थांनी आपापल्या संस्थेत चालू असणारे कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा यांची तपशीलवार माहिती या सदरात घेण्याच्या दृष्टीने माझ्याकडे अवश्य पाठवावी. शक्य असतील तेव्हा छायाचित्रेही द्यावीत. परिसर वार्ता मध्ये नोंद घेणे याचा अर्थ आपल्या मातृसंस्थेच्या इतिहासात घडणाऱ्या लहान सहान गोष्टींची नोंद घेणे आहे.

**यशवंतराव मुक्तविद्यापीठाच्या ग्रंथालय परीक्षेत अर्चना पुजारी महाराष्ट्रात दुसरी :-**

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात चालविल्या जाणाऱ्या ग्रंथालय व माहिती शास्त्र या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेचा २०००-२००१ या शैक्षणिक वर्षातील निकाल ७५.६७% लागला असून या केंद्रातील अर्चना पुजारी महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. मुक्त विद्यापीठाची महाराष्ट्रात ३० केंद्रे या विषयाचा अभ्यासक्रम संयोजित करतात व मे मध्ये झालेल्या परीक्षेस राज्यभरातून सुमारे १२०० विद्यार्थी बसले होते.



अर्चना पुजारी

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात या केंद्राचे हे दुसरे वर्ष असून पहिल्या वर्षीचा निकालही ७२% इतका होता असे अभ्यास केंद्राचे प्रमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनी सांगितले. अर्चना पुजारी हिचे विशेष अभिनंदन प्राचार्य पाटील यांनी केले आहे.

अर्चना पुजारी गतवर्षी महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेत ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाच्या ठाणे केंद्रातून सर्व प्रथम आली होती. मुक्त विद्यापीठाच्या यंदाच्या मे २००१ मध्ये झालेल्या परीक्षेस महाविद्यालयाच्या या केंद्रातून ३७ विद्यार्थी बसले होते. या पैकी २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. या ३७ विद्यार्थ्यांत ३० महिला होत्या.

अर्चना पुजारी हिच्याशी या यशाबाबत संपर्क साधला असता, तिने याचे श्रेय प्राचार्य सी.जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सौ. पेजावर व प्रा. मोहन पाठक यांच्यासह सर्व गुरुजनांना दिले आहे. अर्चना सद्या याच विद्यापीठाच्या

रुपारेल महाविद्यालयातील केंद्रातून निष्णात (पदव्युत्तर पदवी) परीक्षेसाठी अभ्यास करीत आहे. तसेच कल्याणच्या सेंटमेरी इंग्रजी शाळेत तिची ग्रंथपाल म्हणून अलिकडेच नेमणूक झाली आहे.

महाविद्यालयाच्या या केंद्राने लागोपाठ दुसऱ्या वर्षी असे दैदिप्यमान यश मिळवले. या बद्दल अभ्यासक्रम संयोजकांनी प्राचार्य सी.जी. पाटील, त्यांचे सहकारी ग्रंथपाल प्राध्यापक, ग्रंथालयातील सहकारी व महत्त्वाचे म्हणजे विद्याप्रसारक मंडळ यांनी केलेल्या सहकार्याचा कृतज्ञतेने उल्लेख केला.


**निकाल - थोडक्यात**

| | | |
|---|---|---|
| बसलेले विद्यार्थी - | ३७ | |
| उत्तीर्ण | २८ | |
| प्रथम श्रेणी | २४ | |
| द्वितीय श्रेणी | ४ | |
| अघोषित | १ | |
| अनुत्तीर्ण | ८ | |
| टक्केवारी | ७५.६७% | |
| महिला उमेदवार | प्रथम श्रेणी | १८ |
| | द्वितीय श्रेणी | ४ |
| | अनुत्तीर्ण | ८ |
| पुरुष उमेदवार ७ | प्रथम श्रेणी | ६ |
| | अघोषित | १ |

**तंत्रनिकेतनात रिफ्रेशर कोर्स**

व्ही.पी.एम. पॉलीटेक्निक आय.एस.टी.चॅप्टरच्या वतीने दोन आठवड्यांचा रिफ्रेशर प्रोग्राम आयोजित केला होता. (१८ जून २००१ ते ३० जून २००१) 'इन्स्टिट्यूट मॅनेजमेंट' (Educational & Enabling Process) च्या विषयाखाली हा दोन आठवड्याचा कोर्स आयोजित केला गेला.

ज्ञानात भर पडणे व बदलत्या शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेणे हा ह्या कार्यक्रमाचा मूळ हेतू लक्षात घेऊन प्राचार्य मुजुमदार व उपप्राचार्य डी.के. नायक (co-ordinator) व प्रा. गीताली इंगवले (आय.एस.टी.ई. चॅप्टर सेक्रेटरी) यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.




डावीकडून प्रा. गीताली इंगवले, प्राचार्य मुजुमदार, श्री. शरद गांगल, उपप्राचार्य डी. के. नायर

शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती ह्या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून लाभल्या. त्यांच्या भाषणानी सर्व उपस्थित प्राध्यापक वर्गांच्या ज्ञानात भर पडली.

Director B.T.E., D.T.E., R.B.T.E.,(पुणे), निवृत्त प्राचार्य Indian Merchant Chamber (Asst. Director) (Deputy Secretary) (H.O.D.)., अशिदा इलेक्ट्रोनिक्सचे मॅनेजिंग डायरेक्टर, त्या त्या विषयातील

तज्ज्ञ व्यक्तींकडून मोलाचे मार्गदर्शन मिळून शंका निरसन देखील ह्या तज्ज्ञ व्यक्तींकडून उत्तम प्रकारे केले गेले. ह्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून एक Visit (B.T.E.) मुंबईला आयोजित केली होती. प्रा. मुळे सरांनी (Controller of Board examination) B.T.E. मधील नवनवीन उपक्रमांविषयी माहिती दिली.

ह्या कार्यक्रमाला V.P.M'S POLY., I.T. Ulhasnagar, Somaiya Poly., B.I.T. Worli, Mumbai, V.J.T.I. ह्या पॉलीटेक्निकमधील प्राध्यापक वर्ग सहभागी झाला होता. हा कार्यक्रम माहितीपूर्ण व यशस्वी झाला.

मुंबई विद्यापीठाच्या एप्रिल २००१ मध्ये झालेल्या पदवी वर्गाच्या वाणिज्य व कला शाखेचे निकाल बऱ्याच उशीरा जाहीर झाले. आमच्या संस्थेच्या कला वाणिज्य शाखेचे या परीक्षेचे निकाल अतिशय दैदिप्यमान असे आहेत.

वाणिज्य शाखा (तृतीय वर्ष)

| | |
|---|---|
| विद्यापीठाचा निकाल | ६५.४७% |
| महाविद्यालयाचा निकाल | ८३.५०% |
| महाविद्यालयातून बसलेले विद्यार्थी | ४७३ |
| प्रथम वर्ग | १४७ |
| द्वितीय वर्ग | २०१ |
| उत्तीर्ण वर्ग | ३१ |
| अनुत्तीर्ण | ७८ |

शिल्पा शिवाजी मेढेकर ८०.२०% (५६२ गुण) मिळवून महाविद्यालयातून सर्वप्रथम तर रोझलिन परेरा ७१.४२% व तेजस चौधरी ७०% गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय आले.

कलाशाखा (तृतीय वर्ष कला)

| | |
|---|---|
| विद्यापीठाचा निकाल | ८७.६५% |
| महाविद्यालयाचा निकाल | ९२.७१% |
| महाविद्यालयातून बसलेले विद्यार्थी | ३४७ |
| प्रथम वर्ग | ६० |
| द्वितीय वर्ग | २१४ |
| उत्तीर्ण वर्ग | ४८ |
| अनुत्तीर्ण | २५ |

मीरा अरुण शर्मा ७५.५०% (४५३ गुण) मिळवून महाविद्यालयातून सर्व प्रथम आली तर रोझलिन डिसिल्वा (७४.८३%) व अपूर्वा मराठे (७१.८३%) गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य स.वा. गोखले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

निसर्ग मंडळाचा कार्यक्रम



शिबीरातील एका रांगोळीचे छायाचित्र

कला, वाणिज्य महाविद्यालयाच्या निसर्ग मंडळाद्वारे रांगोळीच्या एक दिवसाचा शिबीराचा कार्यक्रम कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी संयोजित केला

गेला. ठाण्याच्या इनरव्हील क्लबतर्फे कार्यक्रम प्रायोजित केला गेला होता. तर संस्कार भारतीच्या कार्यकर्त्यांनी शिबिरार्थींना रांगोळीचे प्रशिक्षण दिले.

या शिबीरात ९८ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. निसर्ग मंडळाच्या प्रमुख प्राध्यापिका सौ. वेके यांनी दिलेल्या माहितीनुसार थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात काही शिक्षकांनी भाग घेतला होता.

**कला वाणिज्य महाविद्यालयाचा विशेष कार्यक्रम**

महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात शनिवार दि. १८ ऑगस्ट रोजी कला वाणिज्य महाविद्यालयाच्या कला मंडळाचे उद्घाटन आणि लोकसत्तेच्या युवासत्ताचे प्रकाशन असा संयुक्त कार्यक्रम लोकसत्ता परिसर अंतरंग आणि महाविद्यालयातर्फे आयोजित केला गेला. या कार्यक्रमास लोकसत्ताचे संपादक डॉ. अरुण टिकेकर हे विशेष अतिथी होते. आपल्या प्रमुख भाषणात डॉ. टिकेकर म्हणाले, '' ठाणे शहर शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून झपाट्याने पुढे येत असून या शहरातील युवा विद्यार्थ्यांना युवासत्ताच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे. या उपक्रमातून ठाणे जिल्ह्यात सशक्त युवा चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल.'' या व्यासपीठाचा उपयोग विद्यार्थ्यांनी आपले लेखन करण्यासाठी करावा असे आवाहन ही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने 'गारवा' फेम मिलींद इंगळे यांनी हिंदी मराठी गीते व गझल सादर केल्या. समीरा गुजर या आभाळमायामुळे प्रसिद्धीस आलेल्या अभिनेत्रीने मिलींद इंगळे यांची मुलाखत घेतली.

महाविद्यालयाचे प्राचार्य स. बा. गोखले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले, '' महाविद्यालयाचे सांस्कृतिक मंडळ आणि युवासत्ता यांच्या माध्यमातून आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी युवकांना मिळेल. आजच्या युवकांना कशातही रस नाही, ते दिशाहीन झाले आहेत असे जे म्हटले जाते ते पूर्णपणे खरे नसून त्यांना दिशा देण्याची व त्यांच्यातील अंगभूत गुणांचा शोध घेण्याची गरज आहे. ठाणे जिल्हा व परिसरातील विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रांत नेत्रदीपक यश मिळविले आहे. पण मुंबईची वृत्तपत्रे त्यांच्या कामगिरीस म्हणावी तशी प्रसिद्धी देत नाहीत.

कार्यक्रमाचे सूत्र संचलन साक्षी बर्वे हिने केले तर प्रा. भिडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी होती. महाविद्यालयाचे प्राध्यापक व लोकसत्ताअंतरंगाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. मुरलीधर सायनेकर यांनी सादर केलेला पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**ग्रंथालय शास्त्र वर्गाचे उद्घाटन**

कला वाणिज्य महाविद्यालयात गतवर्षी पासून मुंबई विद्यापीठाचा ग्रंथालय व माहिती शास्त्र विषयातील पदवीचा अभ्यासक्रम सुरु झाला आहे. या अभ्यासक्रमाच्या या वर्षीच्या वर्गाचे उद्घाटन दि. २० ऑगस्ट रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य स.बा. गोखले यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी या वर्गाची माहिती देऊन महाविद्यालयातर्फे उपलब्ध करून दिलेल्या सोयींचा जास्तीत जास्त फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असे सांगितले. वर्गाबाबतची माहिती सदर अभ्यासक्रमाचे संयोजक व महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी दिली. गतवर्षी या वर्गाचा निकाल ६७% लागला होता.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर प्राथमिक विभाग**

डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या प्राथमिक विभागाने शुक्रवार दि. ३१ ऑगस्ट रोजी शाळेच्या विद्यालंकार सभागृहात 'श्रावण-भाद्रपद महिन्यातील सण व पर्यावरण' या शीर्षकांतर्गत फुले, पत्री, पाने अशा वनऔषधींचे

नाविन्यपूर्ण व अत्यंत उपयुक्त अशा प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

या प्रदर्शनाचे उद्‌घाटन वि.प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष श्री.वि. करंदीकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. नलिनी जोशी, प्र.ग. वैद्य, सौ. मंजिरी दांडेकर, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मळेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रदर्शनात नागपंचमी, मंगळागौर, गोकुळाष्टमी, गौरी-गणपती इ. सणांना लागणारी जास्वंद, सोनचाफा, झेंडू, पारिजातक इ. फुले, दुर्वा, बेल, शमी, तुळस, माका, मधुमालती, जाईचे पान, केळीचे पान, पिंपळ पान, कोरफड, विड्याचे पान, वड, रुई, कडुलिंब, नारळ, सुपारी इ. सुमारे २५ वस्तू मांडल्या होत्या. या वस्तूसमोर तिची औषधी व अन्य माहिती लिहिलेले फलक होते. विद्यार्थी याची प्रत्यक्ष माहिती देत होते. त्याखेरीज नागपंचमी, मंगळागौर, गोकुळाष्टमी, गौरी-गणपती इ. सणांची दृश्ये दाखविण्यात आली होती. लहान मुली नागपंचमीचे गाणे म्हणून नाचत होत्या. मंगळागौर मांडण्यात येऊन मुली तिची आरती करत होत्या. गोकुळाष्टमी व नारळीपौर्णिमाचे दृश्य दाखवून मुलगे-मुली नृत्य करीत होत्या. प्रत्यक्ष गणपती व दोन उभ्या (ज्येष्ठा-कनिष्ठा) गौरी मांडण्यात आल्या होत्या. उत्साही शिक्षिका मंजिरी दांडेकर यांनी संस्कार भारतीचे वैशिष्ट्य असलली रांगोळी काढली होती. रांगोळीच्या मध्यभागी ठेवण्यात आलेले तुळशीवृदांवन शोभून दिसत होते.

प्रदर्शन पाहिल्यानंतर डॉ. बेडेकर यांनी संबंधितांची मुक्तकंठाने स्तुती केली. वनऔषधींची उपयुक्तता माहिती असलेले नाविन्यपूर्ण असे हे प्रदर्शन आहे असे ते म्हणाले.

मुख्याध्यापिकांच्या मार्गदर्शनखाली व शाळेतील शिक्षिकांच्या परिश्रमाने या शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

**श्रीराम जाधव यांना भावपूर्ण निरोप**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या कार्यालयातील लेखापाल व अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. श्रीराम तुकाराम जाधव यांना महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने सेवानिवृत्त होत असल्याबद्दल भावपूर्ण निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात झालेल्या या निरोपसमारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सी.जी. पाटील होते.



**शाल पांघरुन श्री. जाधव यांचा सत्कार करताना प्राचार्य सी.जी. पाटील (डावीकडून प्रा. मोहन पाठक, सुधीर जोशी, डॉ. सौ. माधुरी पेजावर व प्रा. मकरंद दीक्षित)**

प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफल व भेटवस्तू देऊन श्री. जाधव यांच्या सत्कार करण्यात आला. श्री. जाधव यांच्या गेल्या २६ वर्षाच्या सहवासातील अनेक आठवणींना प्राचार्य पाटील सरांनी उजाळा दिला. यावेळी व्यासपीठावर उपस्थित असणाऱ्या पदवीमहाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सौ. माधुरी पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित तसचे महाविद्यालयच्या संघटनेचे युनिट प्रमुख श्री. चं.र. कोरडे,

महाविद्यालयातील सहकारी श्री. प्र.म. महाराव, श्री. व.भा. जाधव, श्री. चंद्रमोहन कर्णिक, सौ. सुनीता शेळवलकर, श्री. रा.तु. मिसाळ, ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांनीही प्रसंगोचित भावना व्यक्त केल्या. सत्काराला उत्तर देताना या सत्काराचा विनम्रपणे आपण स्वीकार करीत असल्याचे सांगून श्री. जाधव यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तुम्हा सर्वांपासून दूर जाताना आपल्या मनातही भावना दाटून आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

या निरोपसमारंभाचे सूत्र संचलन ग्रंथालयातील जुने सहकारी श्री. शरद ललित यांनी केले. समारंभाचे संयोजन करण्यासाठी श्री. चं. र. कोरडे, श्री. म.ज. अमृतकर, ग.द. धाएप आदींनी विशेष मेहनत घेतली. श्री. म.ज. अमृतकर यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.


**प्रा. मोहन पाठक**

ग्रंथपाल

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

•••

**विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अलीकडे घेण्यात आलेली काही वाचनीय पुस्तके.**



अर्थसंकल्प आणि भारतीय अर्थ व्यवस्था - चंद्रशेखर टिळक

महाराष्ट्रातील पालेभाज्या - वि.ग. राहल.

तसेच

मराठी विश्वकोशाचा १६ वा खंड अलीकडेच प्रकाशित झाल्याने तो महाविद्यालयाने घेतला आहे.

**प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

•••